## प्रकरण 3
## इतिहासाविषयीचे महत्त्वाचे सिद्धांत
## इतिहासाच्या चक्राकार गतीचा सिद्धांत (*Cyclical Theory*)

ऐतिहासिक घडामोडींचा साकल्याने, सर्वकषरीत्या अभ्यास करून त्यांच्या संबंधी काही सिद्धांत मांडण्याचे प्रयत्न प्राचीन काळापासून तत्त्ववेत्त्यांनी केले. ऐतिहासिक घडामोडीत एकसूत्रता आढळते का? त्यात काही आकृतिबंध निदर्शनास येतो का? मानवी घडामोडींची वाटचाल कोणत्या दिशेने होते? ती निर्धारित असते का? अशा घडामोडींमागील चालक शक्ती कोणती? ती आंतरिक असते की बाह्य? त्यामागे काही वैश्विक योजना असते का? असे नानाविध प्रश्न तत्त्वज्ञांनी उभे केले आणि आपआपल्या परीने त्यांची उत्तरे देण्याचा प्रयत्न केला. असाच एक प्रश्न ऐतिहासिक घडामोडींच्या गतीबाबतही विचारात घेतला गेला. मानवी जीवन गुंतागुंतीचे आहे. त्यातील घडामोडींचे स्वरूप गोंधळात टाकणारे आहे, हे जरी खरे असले तरी निसर्गातील घडामोडींत ज्याप्रमाणे एक नियमबद्धता आढळते, तशी ती मानवी जीवनात आढळते का? याचा विचार तत्त्वचिंतक करू लागले. संपूर्ण मानवी जीवनाचे, शतकानुशतकांच्या मानवाच्या प्रवासाचे तात्त्विक भूमिकेतून परिशीलन करून त्यातून अनुमानात्मक पद्धतीने काही सिद्धांत मांडलेले आढळतात.

अशा प्रकारचे चिंतन प्रबोधन काळापासून सुरू झाले असे नसून प्राचीन काळातील भारतीय, ग्रीक, रोमन, चिनी, ख्रिस्ती इत्यादी भिन्न संस्कृतीतील तत्त्वज्ञांनी इतिहासाच्या गतीसंबंधी प्रमेये मांडलेली दिसतात. आजवर इतिहासाच्या गतीच्या स्वरूपाचे तीन सिद्धांत मांडले गेले. ते म्हणजे चक्राकार गतीचा (*cyclical*), दुसरा एका सरळ रेषेचा (*Linear*) आणि तिसरा मळसूत्राकार (*spiral*) हे होत. चक्राकार गतीचा सिद्धांत म्हणजे ऐतिहासिक घडामोडींची चाल ही चक्राप्रमाणे असते; चाक जसे वर्तुळाकार फिरते, म्हणजे ज्या बिंदूपासून गतीला प्रारंभ झाला, त्या बिंदूपासून वर जात जात ते पुन्हा प्रारंभीच्या बिंदूला येऊन टेकते आणि पुन्हा तीच वर्तुळाकार गती सुरू होते. पहाट, दिवस, सायंकाळ व रात्र असा चोवीस तासांचा क्रम, किंवा निसर्गात जसे ऋतूंचे चक्र सतत त्याच पद्धतीने चालू असते, त्याचप्रमाणे मानवी जीवनातील घडामोडींतही अशी नियमबद्धता, एक निश्चित क्रम निदर्शनास येतो असा चक्राकार गतीच्या सिद्धांताचा स्थूलमानाने अर्थ आहे. अशा स्वरूपाचे सिद्धांत प्राचीन काळापासून भिन्न राष्ट्रातील, धर्मातील, संस्कृतीतील विचारवंतांनी कसे मांडले ते पाहाणे उद्‌बोधक ठरते.

प्राचीन भारतातील विचार मानवी जीवनाच्या वाटचाली बाबतचे तात्त्विक चिंतन भारतात ऋग्वेद काळापासून झालेले आढळून येते; असे प्रतिपादन प्राचीन भारतीय तत्त्वज्ञानाचे समीक्षक डॉ. शर्मा, डॉ. पा.वा. काणे इत्यादी विद्वानांनी केले आहे. मानवी जीवनाची गती चक्राकार असते ही कल्पना चार युगांच्या संकल्पनेशी जोडलेली आहे. मानवी जीवनाचा प्रवाह सत्य, त्रेता, द्वापार व कली अशा चार युगात विभागला गेला व कली युगानंतर पुन्हा सत्य युगापासून वाटचाल सुरू होणार असे म्हटले गेले. तसेच प्रत्येक युगाची विशिष्ट लक्षणेही स्पष्टपणे मांडण्यात आली आहेत. सत्ययुगात सर्व लोक सत्प्रवृत्त, नीतिमान असतील; सर्वत्र सुखसमृद्धी असेल; मात्र त्यानंतरच्या युगांमध्ये क्रमाक्रमाने नीतीचा हास होईल; निसर्गाची अनुकूलता कमी होत जाऊन समृद्धी घटत जाईल; धार्मिक श्रद्धा कमी होत जाईल; कर्मकांडाला महत्त्व येईल; माणसाची नैतिक अवनती होत जाईल; कलीयुग हे सर्व बाजूंनी पतनाचे युग असेल व कलियुगानंतर पुन्हा सत्ययुगाची पहाट होईल; असा विचार प्राचीन काळातील साहित्यात स्पष्टपणे मांडलेला आढळतो. हा कालचक्राचा विचार परमेश्वरी योजनेशी जोडलेला आहे. कालचक्र हा दैवी योजनेचा भाग आहे. पृथ्वीवर अनीतीचा कळस झाला की प्रलय होईल, सर्व नष्ट होईल, परंतु या विनाशानंतर पुन्हा सत्ययुगाचे नवजीवन प्रारंभ होईल असे प्राचीन भारतीय साहित्यात विवेचन केलेले निदर्शनास येते. जैन व बौद्ध धर्मीयांनी देखील कालचक्राची संकल्पना मांडलेली आढळते. मानवी जीवनाचे कालचक्र विशिष्ट गतीने व विशिष्ट पद्धतीने चालणार; असे जैन व बौद्ध तत्त्वचिंतक म्हणतात. मात्र प्राचीन भारतीयांप्रमाणे ह्या कालचक्राचा सूत्रधार परमेश्वर असल्याचे ते मानीत नाहीत.

इस्लाम धर्मातील विचार इस्लाम धर्मीय तत्त्ववेत्ते कालचक्राची संकल्पना मांडतात. ती संकल्पना कुराणातील विचाराशी संबद्ध आहे. हे कालचक्र पूर्णतः ईश्वरी इच्छेनुसार, मर्जीनुसार चालते, हे सूत्र बहुधा सर्व इस्लामिक विचारवंतांच्या लिखाणात आढळते. याला मोठा अपवाद इब्न खल्दून ह्या विचारवंताचा आहे. तो कालचक्रामागे ईश्वरीसूत्र काही अंशी मानतो, परंतू मानवी जीवनातील स्थित्यंतरे पूर्णपणे ईश्वरी इच्छेप्रमाणे निर्धारित होतात असे न म्हणता त्यामागे अनेक घटक कारणीभूत असतात असे प्रतिपादन करतो. अरब इतिहासलेखनात इब्न खल्दून ह्या चौदाव्या शतकातील प्रज्ञावंत लेखकाने आपल्या '*Muqaddima*' ह्या प्रसिद्ध ग्रंथात ऐतिहासिक विकास व परिवर्तन याचे तर्कनिष्ठ विवेचन करून त्यातून सामान्य सिद्धांताचा शोध घेतला. इतिहास हे संस्कृतीचे शास्त्र आहे आणि संस्कृतीचा जन्म सामाजिक, आर्थिक, भौगोलिक, नैतिक, राजकीय अशा अनेक गोष्टींच्या समुच्चयातून होतो आणि संस्कृती ही जीवमात्राप्रमाणे सजीव असून ती परिवर्तनशील आहे आणि सजीव प्राण्याप्रमाणे संस्कृतीलाही जन्म, विकास व लय हे नियम लागू आहेत असे प्रतिपादन करीत इब्न खल्दून संस्कृतींच्या चक्राकार गतीची संकल्पना स्पष्टपणे मांडतो.

**ग्रीक व व रोमन विचार :-**

ग्रीक तत्त्ववेत्त्यांनी मानवी जीवनाचा अनेक बाजूंनी तर्कशुद्ध-रीत्या गंभीरपणे विचार केलेला आढळतो. ग्रीक तत्त्वज्ञ युगाची संकल्पना मांडतात, युगधर्म ही सांगतात. मानव विशिष्ट युगात विशिष्ट पद्धतीने वागणार, कारण ती कालप्रवृत्ती असते; माणसाच्या इच्छाशक्तीला त्यात फार वाव नाही; मानवी इतिहासाचे चक्र विशिष्ट मतीने फिरते व ते तसेच फिरत राहाणार, त्यात माणूस बदल करू शकत नाही; असे विचार ग्रीक वैचारिक साहित्यात आढळतात. मात्र हे कालचक्र फिरविणारी दैवी शक्ती नसून ते निसर्गाच्या नियमानुसार चालते असे ग्रीक तत्त्वज्ञ म्हणतात. पायथागोरस ह्या धीक गणितज्ञाने विश्वातील घडामोडींचा संबंध ग्रहगोलांच्या भ्रमणाशी जोडला. ग्रहगोलांचे भ्रमण विशिष्ट गतीने व पद्धतीने चक्राकार गतीने चालते असे म्हणून तो इतिहासाच्या पुनरावृत्तीचा विचार मांडतो. एपिक्यूरस ह्या सुप्रसिद्ध तत्त्ववेत्त्याने विश्व ही एक विशाल पोकळी असून त्यात अगणित परमाणू आहेत, त्यांच्या संघाताने जगाची निर्मिती होते व परमाणूंच्या विकेंद्रीकरणाने जगाचा अंत होतो; हे सर्व पुन्हा पुन्हा तसेच घडणार असे प्रतिपादित करून तो कालचक्राचा विचार अधोरेखित करतो. रोमन लेखक हे प्रामुख्याने श्रीकांनी घालून दिलेल्या वाटेने चालणारे व व्यावहारिक जीवनात रस घेणारे असल्यामुळे मानवी जीवनाचा तात्त्विक दृष्टीने स्वतंत्र विचार त्यांनी केलेला आढळत नाही. चिनी विचार :- प्राचीन चिनी साहित्यातही कालचक्राचे विवेचन आढळते. निसर्गातील स्थित्यंतराप्रमाणे आणि ग्रहताऱ्यांच्या भ्रमणानुसार मानवी जीवनात घडामोडी घडत असतात. त्या निर्धारित असतात व निश्चित क्रमानेच घडतात; असा विचार अनेक चिनी तात्त्विक लिखाणात मांडलेला दिसतो. टुंग चुंग शू याने तर पाण्यातील सूक्ष्म जंतूपासून क्रमाक्रमाने माणसाची उत्पत्ती झाली. माणूस हा श्रेष्ठ प्राणी आहे. मात्र ही अवस्था कायम राहाणार नाही. क्रमाक्रमाने ही गती मागे जाऊन पुन्हा माणूस सूक्ष्म जंतूचे रूप घेईल व ही चक्राकार गती अखंड चालेल. अनेक शतकांचा मानवी इतिहासही हीच चक्राकार गती निर्धारित करणार आहे; अशी त्याची वैचारिक भूमिका आहे.

**इराणमधील धारणा :**

प्राचीन इराणी साहित्यातही इतिहासाच्या गतीबद्दलची चक्राकार गतीची कल्पना मांडलेली आहे. तेथील कालचक्राच्या संकल्पनेत बारा वर्षांचे एक कालचक्र मानले आहे व त्याची विभागणी चार सारख्या भागांत केली आहे. म्हणजे तीन हजार वर्षांचे एक अशी चार युगे ते मानतात. मानवी जीवनातील घडामोडींचा संबंध ते देखील ग्रहगोलांच्या भ्रमणाशी जोडतात. मात्र हे विश्व ईश्वराची निर्मिती असल्याचे मानले जाते. कालचक्राची गती व तिची दिशा निर्धारित असते हे ध्यानात घेऊन माणसाने कार्य करावे असा इतिहासविषयक विचार इराणी साहित्यात आढळतो.

**ज्यू व ख्रिस्ती भूमिका :-**

पॅलेस्टाईनमध्ये प्राचीनकाळी असलेला ज्यू धर्म व नंतर प्रादुर्भूत झालेला ख्रिस्ती धर्म यांनी विश्व हे ईश्वरनिर्मित असल्याचे मान्य केले आहे. जगाच्या प्रारंभी सुवर्णयुग होते. परंतु ईश्वरी आज्ञेचे उल्लंघन केल्यामुळे, माणसाचे पतन सुरू झाले, दुःख आपत्ती सुरू झाल्या, पाप व अनीतीचे साम्राज्य पसरले, परंतु यातून मानवाची मुक्तता करण्यास ईश्वर अवतार घेईल व पुन्हा सुवर्णयुग सुरू होईल; असे ज्यू धर्म म्हणतो. हा अवतार म्हणजे येशू ख्रिस्त होय. माणसाचे पाप धुवून काढण्याचे व त्याला मुक्ती देण्याचे कार्य तो करणार व ईश्वराप्रती घेऊन जाणार; असे ख्रिस्ती धर्म सांगतो. हिंदू धर्मशास्त्रातील प्रलयाच्या कल्पनेप्रमाणे प्रलयाचा विचार त्यात आलेला आहे, मात्र नोहाच्या होडीत काही प्राणी सुरक्षित राहातील व त्यातून पुन्हा नव्या जगाची निर्मिती होईल व कालचक्र सुरू राहील असा विचार मांडलेला आढळतो. सामान्यतः प्राचीन काळी हा कालचक्राचा व ईश्वरी सूत्राचा विचार तत्त्ववेत्यांनी पुरस्कृत केलेला दिसला तरी चीनमधील हॅन-फी-त्से किंवा भारतातील चाणक्य ह्याचे समर्थन करीत नाहीत. इब्न खल्दून हा अरब विचारवंतही त्याचे पूर्णपणे समर्थन न करता मानवी कृतीचे महत्त्व प्रतिपादित करताना दिसतो.

इसवी सनाच्या पंधराव्या शतकात झालेल्या विद्येच्या पुनरूज्जीवनानंतर मानवी कर्तृत्त्वाचा विचार अधिकाधिक अधोरेखित होऊ लागला व त्यामुळे ईश्वरी शक्तिसूत्राचा व मानवी घडामोडींच्या चक्राकार गतीचा विचार मागे पडू लागला. परंतु काही आधुनिक युरोपीय विचारवंत व्यापक व तर्कशुद्ध दृष्टीने शतकानुशतकांच्या मानवी घडामोडींचे परिशीलन करू लागले व त्यातून निष्कर्षात्मक रूपाने चक्राकार गतीचा सिद्धांत मांडू लागले. अशा आधुनिक तत्त्ववेत्त्यामध्ये इटालियान विचारवंत व्हिको, जर्मन तत्त्वचिंतक स्पेन्गलर आणि इतिहासाचा व्यापक व्यासंग असलेला ब्रिटिश इतिहासकार टॉयन्बी हे अग्रगण्य होत.

**गामबातिस्ता व्हिको (*Giambattista Vico* १६६८ - १७४४):**

हा इटालियन विचारवंत कायदा व सांस्कृतिक इतिहासाचा अभ्यासक होता. इतिहासाविषयीची त्याची वैचारिक धारणा तत्कालीन प्रबोधन युगातील वैचारिक भूमिकेहून भिन्न होती. 'युनिव्हर्सल लॉज' *(Universal Laws)* हा त्याचा त्रिखण्डात्मक ग्रंथ आणि 'न्यू सायन्स' *(New Science)* हे त्याचे विशेष प्रसिद्ध लिखाण होय. त्या काळात शास्त्रीय ज्ञानाच्या होत असलेल्या विकासामुळे, निसर्गाप्रमाणेच गतकालीन मानवी जीवनाचा अभ्यास देखील शास्त्रीय पद्धतीने करून त्याबाबत काही सर्वसामान्य सिद्धांत मांडता येतात; असे मत काही विचारवंत पुरस्कृत करीत होते. ह्या विचाराचे जोरदार खंडन व्हिकोने केले. त्याचा युक्तिवाद असा की इतिहास आणि निसर्ग ह्या दोन भिन्न गोष्टी आहेत, त्या दोहोत मूलभूत भेद आहे आणि म्हणून निसर्गाच्या अभ्यासाला उपयुक्त असणारी शास्त्रीय पद्धती इतिहासाच्या अभ्यासासाठी वापरणे शक्य नाही.

व्हिको मानवी समाजाच्या विकासाच्या संबंधात चक्राकार गतीचा विचार प्रतिपादित करतो. मानवी समाजाच्या विकासाचे तो चार टप्पे सांगतो. ह्या चार अवस्थांतून गेल्यानंतर मानव समाज पुन्हा पहिल्या अवस्थेत येतो; असे त्याचे प्रतिपादन आहे. यांपैकी पहिली अवस्था म्हणजे भटके रानटी युग. त्या काळात मानवाच्या पाशवी प्रवृत्तीवर अतिमानवी शक्तीच्या भीतीचे नियंत्रण असते. दुसऱ्या युगाला तो 'हिरोईक' युग म्हणतो. ह्या काळात शूरवीरांच्या हाती शासनाची सूत्रे असतात, आर्थिक व्यवस्था शेतीवर अधिष्ठित असते व समाज सामान्य शेतकरी व सरंजामदार यांत विभागलेला असतो. तिसऱ्या अवस्थेला तो 'क्लासिकल' असे नाव देतो. ह्या काळात बुद्धी व विचाराला प्राधान्य मिळते, अभिजन वर्ग प्रभावी असतो, चौथी अवस्था ही अखेरची. ह्या काळात सामान्य लोक अधिकारासाठी संघर्ष करू लागतात. समाजातील चालीरीती मूलतः बदलतात; ह्या सामान्यांच्या काळात लोकांची क्षमता घसरणीला लागते, भ्रष्टाचार वाढतो व समाजाचे विघटन होऊ लागते. ह्या अवस्थेचा अंत यादवीने अगर बाह्य आक्रमणाने होऊ शकतो. अशा अंतानंतर समाज पुन्हा भटक्या, रानटी प्राथमिक अवस्थेत जातो असे हे समाजाच्या गतीचे चक्र चालू असते व समाजाला एकामागून दुसरी अशा त्याच ठराविक अवस्थेतून जावे लागते, व्हिकोचे मानवी जीवनाच्या प्रवासाचे हे विश्लेषण चक्राकार गतीच्या सिद्धांताचे द्योतक आहे.

**ओसवाल्ड स्पेन्गलर (*Oswald Spengler* : १८८०-१९३६) :**

ऐतिहासिक घडामोडींचा अन्वयार्थ चक्राकार गतीच्या सिद्धांतानुसार लावणारा दुसरा विचारवंत ओसवाल्ड स्पेन्गलर हा होय. इतिहासाचे तत्त्वज्ञान मांडणारा हा जर्मन तत्त्वचिंतक *The Decline of the West* या द्विखण्डात्मक ग्रंथाने प्रसिद्धीस आला. ह्या ग्रंथाचा पहिला खण्ड १९१८ व दुसरा १९२२ साली प्रसिद्धीस आला. पहिल्या महायुद्धात झालेला संहार, जर्मनीचा झालेला पराभव, मानहानी व त्यातून उद्भवलेली विमनस्कता व नैराश्य ह्या पार्श्वभूमीवर स्पेन्गलरच्या ग्रंथाचा प्रभाव पाश्चात्य जगावर पडला. इतिहासाची वाटचाल सरळ रेषेत प्रगतीच्या मार्गाने होत असलेली आढळत नाही, निसर्गाप्रमाणे मानवी समाज निधि नियमानुसार चालताना दिसतो. ज्याप्रमाणे उदयानंतर अस्त किंवा जन्मानंतर मृत्यू ठरलेला आहे, हा क्रम कधी बदलत नाही, कोणी बदलू शकत नाही, तसेच मानवी समाजाचे आहे. समाज हा सजीव आहे, सेंद्रिय आहे, असे स्पेन्गलर प्रतिपादित करतो. इतिहास म्हणजे केवळ घटनांचा अभ्यास नव्हे तर मानवी संस्कृतीचा अभ्यास होय. हा अभ्यास अधिक उद्बोधक असतो; असे मत तो व्यक्त करतो व त्याबरोबरच पूर्वीच्या संस्कृतीचा प्रभाव त्यानंतर जन्माला येणाऱ्या संस्कृतीवर पडतो ह्या मताचे तो खंडन करतो. कारण त्याच्या मते प्रत्येक संस्कृतीची मूलभूत वैशिष्ट्ये असतात. त्यानुसार संस्कृती विकसित होते, परिस्थितीमुळे त्यात बदल होत नाही; असा युक्तिवाद तो करतो.

स्पेन्गलरने मानवी संस्कृती हा अभ्यासविषय निवडला. कारण संस्कृती हा इतिहासाचा आत्मा आहे असे तो मानतो. इजिप्त, बॅबिलोनिया, भारत, चीन, ग्रीक रोमन, अरब, मेक्झिको व आधुनिक पाश्चात्य संस्कृती यांचे चिकित्सक विश्लेषण त्याने केले प्रत्येक संस्कृतीचे एक विशिष्ट प्रतीक असते आणि त्या संस्कृतीच्या घटकांचे स्वरूप त्या प्रतीकातून दृग्गोचर; होते असे मत तो व्यक्त करतो. उदाहरणार्थ: इजिप्तच्या संस्कृतीचे प्रतीक पाषाण, ग्रीकचे सौंदर्य, भारताचे आत्म्याच्या मुक्तीची संकल्पना तर आधुनिक पाश्चात्य संस्कृतीचे मोठी गुहा आहे; असे तो म्हणतो. प्रत्येक संस्कृतीचे नियत कार्य असते आणि ते संपले की ती संस्कृती लयाला जाते व त्यानंतर नव्या संस्कृतीचा उदय होतो असे तो प्रतिपादन करतो. जन्माला आलेल्या मुलाच्या जशा वाढीच्या अवस्था ठरलेल्या असतात, त्याचप्रमाणे उदयाला येणाऱ्या प्रत्येक संस्कृतीच्या विकासाच्या अवस्था निर्धारित असतात. अशा चार अवस्था तो सांगतो. जीवन चक्रातील पहिली अवस्था भटक्या व रानटी स्वरूपाची. या काळात निसर्गात मिळेल ते भक्षण करतो. दुसरी अवस्था स्थिर जीवनाची तो यात मानव शेतीव्यवसाय व इतर उद्योग करू लगतो. पशुपालन करतो व आपल्या अंतःप्रेरणेनुसार काम करतो. तिसरी अवस्था ही संस्कृतीच्या निर्मितीची असते. ह्या अवस्थेच्या पहिल्या कालावधीत राज्यशासन अस्तित्वात येते. समाजाच्या धारणेचे नीतिनियम, धर्म, मूल्य व्यवस्था तयार होते. कला, तत्त्वज्ञान यांचा विकास होऊन माणसाच्या सृजनशीलतेचा भिन्न प्रकारे आविष्कार होतो; शासनाची सूत्रे प्रतिष्ठित, सुसंस्कृत अशा लहान समाजगटाच्या हाती असतात. नागरी संस्कृती वाढीला लागून भौतिक जीवनही सुखकर बनते. याला तो *Culture* ची अवस्था म्हणतो. परंतु ह्या तिसऱ्या अवस्थेची परिणती शेवटी भौतिकवादी संस्कृतीत होते. जीवनमूल्यांचा -हास होऊ लागतो, समाजात अन्याय, भ्रष्टाचार, शोषण वाढते. लोक भोगवादाच्या व खोट्या प्रतिष्ठेच्या मागे जातात. नगरांची बेसुमार वाढ होऊन धनिक व दरिद्री यांतील तफावत वाढत जाते. एका बाजूला ज्ञानाची वृद्धी झाली तरी त्या ज्ञानाने समाजाचे प्रश्न सुटण्यास मदत होत नाही. शिवाय दुसरीकडे अज्ञानही वाढते. संधिसाधूपणा वाढतो. लोक यंत्राचे गुलाम बनतात. लोकशाही केवळ नाममात्र शिल्लक राहाते. प्रसार माध्यमांचा वापर सत्ताधीश अनिष्ट प्रकारे करतात; नीतिमान व्यक्तीऐवजी संधिसाधू उपटसुंभ सत्ता बळकावतात. ही संस्कृतीच्या तिसऱ्या अवस्थेची अखेरी असते. ह्या काळाला तो *Civilization* म्हणजे भौतिक संस्कृती म्हणतो. ह्या अवस्थेला पोचलेल्या संस्कृतीची शेवटची अवस्था ऱ्हास, विघटन व विनाशाची असते. संस्कृतीच्या विनाशानंतर समाज पुन्हा भटक्या रानटी अवस्थेत परत जातो. हा क्रम ठरलेला आहे. त्यात कोणत्याही गोष्टीमुळे - उदाहरणार्थ; भौगोलिक परिस्थिती, बाह्य कारणे यामुळे बदल होत नाही. कोणत्याही परिस्थितीत राहिली तरी गाय पक्षी बनू शकत नाही, त्याचप्रमाणे संस्कृतीचे मूळ स्वरूप, मूलभूत वैशिष्ट्ये बदलत नाहीत. जसे भारतीय संस्कृतीचे वैशिष्ट्य आध्यात्मिकता तर पाश्चात्य संस्कृतीचे शारीरिक सामर्थ्य - असे स्पेन्गलर मानतो. त्याच्या मते पाश्चात्य संस्कृती विसाव्या शतकाच्या प्रारंभी भौतिक संस्कृतीच्या टप्प्याला पोचली आहे; आदर्शाचा व मूल्यांचा ऱ्हास झाला आहे. आणि म्हणून ती विघटनाच्या मार्गे विनाशाकडे वाटचाल करीत आहे; असे मत तो मांडतो. संस्कृतीचे रूपांतर भौतिक संस्कृतीत होण्याची लक्षणे जी स्पेन्गलरने सांगितली - उदाहरणार्थ; वांशिक

सरमिसळ, बहुजिनसी नागरी समाज, वांशिक तणाव, भौतिकवाद, चंगळवाद, तंत्रज्ञानाची अनिबंध वाढ. परंतु वाढते दारिद्रय, सत्तापिपासा, नास्तिकता - ही सर्व लक्षणे पाश्चात्य संस्कृतीत आढळतात आणि म्हणून ती विनाशाच्या मार्गाने जात असल्याचा इशारा तो देतो. एकूण मानवी संस्कृतीच्या वाटचालीच्या अवस्था ठरल्या आहेत. त्या निर्धारित क्रमानेच वाटचाल करणार व हे चक्र पूर्ण झाले की नव्याने संस्कृतीच्या उदयाची अवस्था येणार; ह्या स्पेन्गलरने प्रतिपादन केलेल्या मूलभूत सूत्रामुळे त्यात चक्राकार गतीच्या सिद्धांताचा प्रत्यय येतो.

**अर्नाल्ड टॉयन्बी (*Arnold Toyanbee : १८८९-१९७५*) :**

अर्नाल्ड टॉयन्बी हा विसाव्या शतकातील जागतिक कीर्तीचा ब्रिटिश तत्त्वज्ञ होय. इतिहासाबरोबर पुरातत्त्वशास्त्र, ग्रीक व लॅटिन भाषांचाही त्याचा व्यासंग होता. परराष्ट्र खात्यातील नोकरीच्या निमित्ताने तो पॅरिसच्या शांततापरिषदेला उपस्थित होता. १९२० नंतरच्या कालावधीत त्याने बरेच लिखाण केले. त्यांपैकी '*A Study of History*' ह्या १९३४ नंतरच्या वीस वर्षांत प्रकाशित झालेल्या बारा खंडांच्या प्रचंड ग्रंथराजाने त्याला इतिहासाचा तत्वचिंतक म्हणून प्रसिद्धी मिळवून दिली. हा ग्रंथराज त्याच्या प्रगाढ व्यासंगाचे, अथक परिश्रमाचे, तीक्ष्ण बुद्धिमत्तेचे प्रतीक आहे. त्याच्या विषयाचा आवाका ध्यानात घेता तो ग्रंथ म्हणजे इतिहासाचे 'महाकथन' *(metanarrative)* आहे असे म्हणणे अतिशयोक्तीचे ठरणार नाही. "इतिहासाच्या तत्त्वज्ञानाला मौलिक योगदान करणारा प्रचंड ग्रंथ" असा ह्या ग्रंथाचा गौरव इतिहास समीक्षक बार्नस् याने केला आहे.

इतिहासाविषयी टॉयन्बीची भूमिका स्पष्ट आहे. ऐतिहासिक घटनांचा अगर राष्ट्राचा, एखाद्या जनसमूहाचा अगर एखाद्या खंडाचा राजकीय किंवा सामाजिक इतिहास मानवी जीवनाचे साकल्याने दर्शन घडवीत नाही. असे समग्र दर्शन करून घेण्यासाठी संस्कृतीचा अभ्यास आवश्यक आहे, तसेच एका संस्कृतीचा अभ्यासही अपुरा आहे. अनेक संस्कृतींचा तौलनिक अभ्यास मानवी जीवनाच्या वाटचालीचे मूल रूप, त्यातील आकृतीबंध उलगडून दाखवू शकतो अशी त्याची धारणा असल्याने, त्या अनुरोधाने ह्या ग्रंथासाठी मानवाच्या इतिहासातील एकवीस संस्कृतींचा तौलनिक अभ्यास हा विषय त्याने निवडला. त्याच्या पूर्वी मानवी संस्कृती हा अर्थपूर्ण इतिहासाचा विषय आहे असा विचार इंग्लंडमध्ये हेन्री थॉमस बकल याने १९व्या शतकात मांडला होता व युरोपीय संस्कृतीच्या तौलनिक अभ्यासाचा प्रकल्प हाती घेतला होता. सुमारे सहा हजार वर्षांच्या प्रदीर्घ कालखंडातील एकवीस विकसित व पाच अविकसित संस्कृतींच्या उदयास्ताचे तो ह्या ग्रंथात चिकित्सक विश्लेषण करतो. त्यांच्या उदय, विकास व अस्ताची बारीकसारीक तपशिलासह कारणमीमांसा करतो. मानवी समाजाच्या प्रारंभीच्या रानटी, भटक्या अवस्थेनंतर भिन्न संस्कृतींची घडण कशी होत गेली? त्यातील काही विकसित झाल्या तर काही कुंठित होऊन त्याच अवस्थेत लयाला गेल्या, याची कारणे कोणती? विकसित झालेल्या संस्कृतीचा विनाश का झाला? याचा उहापोह करीत असताना तो सुरुवातीला त्याच्या पूर्वसूरींनी मांडलेल्या मतांचा समाचार घेतो, ते खोडून काढतो व त्यानंतर स्वतःचे निष्कर्ष प्रतिपादित करतो. आपल्या सिद्धांतांची बैठक दृढ करण्यासाठी तो ठिकठिकाणी ऐतिहासिक घटनांचे दाखलेही देतो.

**संस्कृतीच्या उदयास्ताची मीमांसा :-**

एकवीस संस्कृतींच्या सखोल अध्ययनातून टॉयन्बीला एक समान आकृतिबंध आढळून आला. त्या आधारे तो विषयाची मांडणी करतो. त्याच्या विवेचनाचा थोडक्यात आशय असा की, काही समाज भटक्या अवस्थेतून संस्कृतीच्या उदयाच्या टप्प्यात पाऊल ठेवतात. परंतु त्यांचा मार्ग तेथेच अवरुद्ध होतो. त्या विकसित होत नाहीत व कालांतराने लुप्त होतात. काही समाज मात्र संस्कृतीच्या घडणीत यशस्वी होतात. संस्कृतीच्या उदयाची कारणमीमांसा करताना, त्यासाठी जन्मजात वांशिक गुण आणि अनुकूल भौगोलिक स्थिती कारणीभूत असल्याचे मत तो खोडून काढतो. त्याच्या मते संस्कृतीच्या निर्मितीसाठी समतोल भौगोलिक परिस्थिती आणि कार्यक्षम, बुद्धिवान, सृजनशील अशा अल्पगटाचे अस्तित्व आवश्यक असते. समाजाच्या विकासाच्या प्रक्रियेत पदोपदी नवी आव्हाने उपस्थित होतात, नव्या समस्या निर्माण होतात, त्या समस्यांची उत्तरे शोधण्यात हा लहान सृजनशील गट यशस्वी होतो. सतत निर्माण होणाऱ्या समस्यांचे योग्य प्रकारे निराकरण झाल्यामुळे विकासाच्या मार्गातील अडथळे दूर होतात व विकास अखंडितपणे चालू राहातो. ह्या

प्रक्रियेला तो *Challenge and Response* चा सिद्धांत म्हणतो, 'चॅलेंज' म्हणजे समाजापुढे येणारी आव्हाने, समस्या व 'रिसपॉन्स' म्हणजे यशस्वी उत्तरे. अशा प्रकारे संस्कृती विकासाच्या मार्गावर वाटचाल करू लागली की तिचा विकास एका उच्च बिंदूला, कळसाला पोचतो. तो संस्कृतीच्या विकासाचा उच्चांक असतो. असा उच्चांक गाठण्यासाठी प्रादेशिक विस्तार किंवा तंत्रज्ञानाची, विज्ञानाची प्रगती ह्या गोष्टी कारणीभूत नसतात; असे टॉयन्बी म्हणतो. त्याच्या मते प्रत्येक समाजात काही अंगभूत गुण सुप्तरूपात असतात. त्यांचा विकास हेतुपुरस्सरपणे करावा लागतो, त्यात सृजनशील गट कार्यरत असतो. ह्या विकासाच्या अवस्थेतही आव्हाने, समस्या सतत पुढे येतात, त्यांना सृजनशील गट उत्तरे देत राहातो. ह्या प्रक्रियेत अडथळ्यामुळे एखादे पाऊल समाज मागे जातो; परंतु अल्पावधीतच योग्य उत्तर मिळाल्याने विकासाच्या मार्गावर समाज पुन्हा वाटचाल करू लागतो. ह्या स्थितीला टॉयन्बी *withdrawal and return'* म्हणजे एक पाऊल मागे जाऊन पुन्हा पूर्वस्थितीला परत येणे असे म्हणतो. समाजाच्या सुप्त गुणांचा आविष्कार ह्या अवस्थेत होतो तेव्हा आत्म्याची शुद्धी होते, नैतिक सामर्थ्य वाढते. धर्माची मूलतत्त्वे आविष्कृत होतात. हा संस्कृतीच्या विकासाचा उच्च बिंदू असतो, कळस असतो. मात्र सर्वोच्च अवस्थेला पोचल्यानंतर ती अवस्था फार काळ टिकत नाही. विकासाचा उच्चांक गाठलेली संस्कृती अवनतीच्या मार्गाला लागते. याचे कारण असे की पूर्वीप्रमाणे ह्या काळातही समस्या निर्माण होतात, परंतु पूर्वीच्या अवस्थेप्रमाणे त्यांची योग्य उत्तरे शोधणारा समाजातील बुद्धिजीवी वर्ग असमर्थ ठरतो. उत्तरांचा प्रयत्न होतो; समस्येचे योग्य उत्तर सापडले नाही की पर्यायी उत्तरे शोधली जातात. त्यामुळे कधी समस्येचे काही अंशी निराकरण होते, परंतु ती पूर्णांशाने सुटत नाही. समस्यांची गुंतागुंत वाढत जाते. अशा स्थितीत समाजात अनिष्ट प्रवृत्ती वाढतात, समाजात ऐक्य शिल्लक राहात नाही, फुटीर वृत्ती बळावतात. आत्मविश्वास ढळतो. ही विनाशाच्या मार्गाची लक्षणे असतात. विनाशाच्या मार्गाचेही टॉयन्बी तीन टप्पे कल्पितो. संस्कृतीची इमारत कोलमडू लागणे (*breakdown*), दुसरा विघटन (*disintegration*) व तिसरा लय (*dissolution*). ह्यांपैकी पहिल्या व तिसऱ्या टप्प्यात शतकाचे देखील अंतर असू शकते. आव्हानांचे योग्य उत्तर न सापडल्याने संस्कृती कोलमडू लागली की ते थोपवून धरण्यास दमन शक्तीचा वापर अल्पसंख्य गट करतो, त्यातून एकाधिकारी सत्ता उदयाला येतात व विनाश अटळ दिसू लागतो. परंतु स्पेन्गलर प्रमाणे विनाश ही अटळ अवस्था आहे असे टॉयन्बी सांगत नाही. तो एक आशेचा किरण दाखवतो. तो म्हणतो विघटनाच्या अवस्थेत देखील मौलिक धर्मतत्त्वे विनाश टाळू शकतात. आधुनिक मानवाजवळ शतकानुशतकांच्या अनुभवाचे अपार भांडार असल्यामुळे धर्मतत्त्वांचे पालन करून आत्मबळाच्या आधारे ऱ्हासाच्या अवस्थेतही आव्हानांना उत्तरे शोधत अनेक वर्षे संस्कृती टिकाव धरू शकते. आधुनिक पाश्चात्य संस्कृती विनाशाच्या मार्गे जात असून तिचा नाश अटळ आहे अशी टॉयन्बीची भूमिका नाही. ऱ्हासाला लागलेली ही संस्कृती आंतरिक प्रेरणा, धर्मतत्त्वांच्या, आत्मशक्तीच्या आधारे विनाश टाळू शकते; असा आशेचा सूर तो व्यक्त करतो. अशा प्रकारे संस्कृतींच्या उदय, विकास व अस्ताचे कारण तो आव्हान व उत्तर ह्या सिद्धांतात शोधतो ते त्याच्या विवेचनाचे मूळ सूत्र आहे.

संस्कृतीच्या इतिहासाची टॉयन्बीने केलेली मीमांसा अनेक समीक्षकांना मान्य नाही. ही मीमांसा इतिहासकाराच्या भूमिकेतून त्याने केलेली नाही. प्रारंभी चिकित्सक विवेचकाची त्याची भूमिका अखेरपर्यंत टिकत नाही. तो अध्यात्माच्या क्षेत्रात प्रवेश करतो व प्रेषिताची भूमिका घेतो, पुढे भविष्यात काय घडू शकेल याचे वर्णन करतो. ही तर्कनिष्ठ इतिहासकाराची भूमिका नव्हे असे अनेक आक्षेप टॉयन्बीच्या लिखाणावर घेण्यात आले आहेत. परंतु अभ्यासविषयाचा प्रचंड आवाका, तौलनिक तार्किक विश्लेषण, संस्कृतींच्या उदयास्ताच्या कारणांचा उहापोह करताना त्याने दिलेला बारिकसारिक तपशील, अनेक उदाहरणे हे सर्व त्याच्या गाळ्या विद्वत्तेचे निदर्शक आहे. एवढा प्रचंड विषय अध्ययनासाठी निवडणारा तोवरचा टॉयन्बी हा पहिला इतिहासलेखक होय. शिवाय तोवर इतिहासलेखनाच्या युरोपकेंद्रित स्वरूपाला त्याने छेद दिला; युरोप पलीकडील संस्कृतीच्या अध्ययनाचे महत्त्व प्रतिपादित केले व वैश्विक दृष्टी दिली. इतिहासाच्या क्षेत्रात वाढू लागलेल्या लहान विषयांच्या विशेष अभ्यासापेक्षा इतिहासाच्या अभ्यासाची व्यापक दृष्टी दिली आणि तौलनिक अध्ययनातून युरोपबाहेरील संस्कृतीची वैशिष्ट्ये लक्षणीय असल्याची जाणीव निर्माण केली. जागतिक संस्कृतीच्या उदयास्ताचे तात्विक भूमिकेतून विवेचन करणारा हा ग्रंथ म्हणजे इतिहासाचे महाकथन आहे, इतिहासाच्या तत्त्वज्ञानाला केलेले मोलाचे योगदान आहे याबद्दल वाद नाही.

## समाजशास्त्रीय इतिहास
## *(Sociological Theory of History)*

समाजशास्त्रीय दृष्टिकोणातून इतिहासाचे अध्ययन ही संकल्पना इतिहास लेखनाच्या क्षेत्रात बरीच अलीकडे, म्हणजे सुमारे दीडशे वर्षात उदयाला आल्याचे निदर्शनास येते. एकोणिसाव्या शतकापर्यंत इतिहासलेखनाचे विषय प्रामुख्याने राजकीय असत. सीलेने, 'इतिहास म्हणजे गतकालीन राजकारण' ही इतिहासाची केलेली व्याख्या ह्याच दृष्टिकोणाची द्योतक आहे. राजकीय घडामोडी लक्षवेधी व रंजक असल्यामुळे व त्या संबंधीचे ऐतिहासिक साहित्य मिळणे सुकर असल्यामुळे लष्करी मोहिमा, युद्धे, क्रांत्या, राष्ट्राराष्ट्रांतील संबंध असे विषय प्रामुख्याने हाताळले जात. तसेच तोवरचा इतिहास घटनाधिष्ठित व व्यक्तिकेंद्रित होता. महान व्यक्तींचे, वीरपुरुषांचे, प्रभावशाली प्रशासकांचे जीवनचरित्र, कार्यकर्तृत्व इतिहासलेखनाचे वर्ण्यविषय असत.

इतिहासाकडे पाहण्याचा हा दृष्टिकोण एकोणिसाव्या शतकाच्या लोकशाहीच्या युगात बदलू लागला. इतिहास म्हणजे मानवी जीवनाचा आलेख आहे, राजकीय घडामोडी हाच केवळ मानवी जीवनाचा महत्त्वपूर्ण पैलू नाही, मानवी जीवन विविधांगी आहे; तसेच व्यक्ती, मग ती कितीही महान असो, समाजाचा केवळ एक घटक आहे, त्यामुळे व्यक्तीचा नव्हे तर समाजाचा आणि केवळ राजकीय नव्हे इतरही पैलूंचा अभ्यास केल्याखेरीज मानवी जीवनाचे यथार्थ आकलन होणार नाही, अशी धारणा विचारवंतात मूळ धरू लागली. मानवी समाज व संस्कृतींच्या व्यापक अध्ययनाचे, समाज व संस्कृतीच्या चिकित्सक विश्लेषणाचे महत्त्व अधोरेखित केले जाऊ लागले. तसेच मानवी जीवनाचे साकल्याने व तर्कशुद्ध आकलन करून घ्यावयाचे असेल तर त्याच्या आर्थिक, सामाजिक, बौद्धिक, कलात्मक अशा सर्व अंगांचा सखोल अभ्यास करून, त्यातील मूलतत्त्वे शोधून काढणे निकडीचे वाटू लागले. मानवी समाजाचे अर्थव्यवहार, समाजजीवन, संस्कृती इत्यादी पैलूंचा शास्त्रीय पद्धतीने अभ्यास होऊ लागला आणि त्यातून राज्यशास्त्र, अर्थशास्त्र, मानसशास्त्र, समाजशास्त्र अशा मानव्यशास्त्राच्या स्वतंत्र ज्ञानशाखा विकसित झाल्या. मानवी समाजाचा राजकीय इतिहास, आर्थिक इतिहास, सांस्कृतिक इतिहास, सामाजिक इतिहास असे नवे इतिहासलेखन प्रवाह रूढ होऊ लागले.

सामाजिक इतिहासाची सुरुवात राजकीय घडामोडी इतकेच सामाजिक जीवनाचे अध्ययन उद्‌बोधक आहे हा विचार काही इतिहासकारांनी अठराव्या शतकातही मांडला होता. विलीयम रॉबर्टसनने '*History of the Emperor Charles V*' ह्यात सामाजिक जीवनाचे चित्रण केलेले आढळते. औद्योगिक क्रांतीने समाजात इतके आमूलाग्र परिवर्तन घडून आले की त्या विषयाने इतिहासकारांचे लक्ष आकृष्ट केले आणि एकोणिसाव्या शतकापासून औद्योगिक क्रांतीचे श्रमिक वर्गावरील परिणाम, ग्रामीण व नागरी जीवनावरील, तसेच एकूण समाजावरील परिणाम यांची दखल इतिहासकार घेऊ लागले. ह्या दृष्टीने जे. एल आणि बार्बारा हॅमंड यांचे १९११ साली प्रकाशित झालेले '*The Village Labourer,* 'एली हालवीचे' '*The English People in 1815,* जी. डी. एच्. कोल याचे '*The Common People*' आणि सामाजिक इतिहास म्हणून विशेष प्रसिद्ध झालेले जी. एम्. ट्रिव्हेलिय यांचे '*The English Social History*' ग्रंथ विशेष उल्लेखनीय आहेत. घटनेऐवजी समाज वर्ण्यविषय निवडला गेल्याने साहजिकच तो दीर्घकाळाचा इतिहास झाला. ट्रिव्हेलियन यांनी आपल्या इंग्लंडच्या सामाजिक इतिहासात १६ ते १९ अशा चार शतकांचा आढावा घेतला. १९२७ साली केंब्रिज विद्यापीठात आधुनिक इतिहासाचे प्राध्यापक म्हणून रुजू झालेले ट्रिव्हेलियन हे इंग्लंडमधील एकोणिसाव्या शतकाच्या पूर्वार्धातील ख्यातनाम राजनीतीज्ञ व इतिहासकार लॉर्ड मेकॉले यांचे नातू! ट्रिव्हेलियन यांनी आपल्या इंग्लंडच्या सामाजिक इतिहासात चारशे वर्षांतील सामाजिक उत्क्रांतीचे विवेचन केले आहे. ह्या कालावधीत

इंग्लिश समाजाची जीवनपद्धती, राहाणी, कुटुंबसंस्था, चालीरीती रूढी, धर्मविषयक विचार, जीवनमूल्ये, निसर्गाबाबत दृष्टिकोण, उत्पादनाची व्यवस्था, उपजीविकेची साधने इत्यादींत झालेल्या स्थित्यंतराचे विवेचन करून त्यांनी, समाजाचे सर्वंकष दर्शन घडविले आहे. '*History of the people with politics left out*' ह्या त्यांनी केलेल्या सामाजिक इतिहासाच्या व्याख्येने इतिहासाच्या वर्तुळात टीकेचे वादळ उठविले, आणि त्यांच्या ग्रंथावरही बरीच साधकबाधक चर्चा झाली.

वर उल्लेखिलेले ग्रंथ हे सामाजिक इतिहासाच्या कक्षेत मोडतात. मात्र सामाजिक इतिहास म्हणजे समाजशास्त्रीय इतिहास नव्हे. दोहोत काहीसे साम्य असले तरी मूलभूत भेदही आहे. दोहोतील समान घटक म्हणजे दोहोंचा विषय मानवी समाज हा आहे. परंतु सामाजिक इतिहास व समाजशास्त्रीय इतिहास ह्यात भेद आहे; तो विषयाच्या निवडीचा नसून वर्ण्यविषयाबाबतच्या दृष्टिकोणाचा आहे. ट्रिव्हेलियनने सांगितल्याप्रमाणे समाजाचे, त्यातील भिन्न गटांचे दैनंदिन जीवन, भोजन पद्धती, वेशभूषा, चालीरीती, धार्मिक निष्ठा, परंपरा, मूल्यव्यवस्था उपजीविकेची व करमणुकीची साधने, कौटुंबिक जीवन, तसेच सामाजिक स्थित्यंतरे यांचे वर्णन सामाजिक इतिहासात अपेक्षित आहे. समाजशास्त्रीय इतिहासलेखनाचे स्वरूप याहून भिन्न आहे. विषयाची निवड हे त्याचे व्यवच्छेदक लक्षण नाही; तर विषयाची मांडणी, त्याची शास्त्रीय पद्धतीने चिकित्सा आणि त्या चिकित्सक विश्लेषणातून सामाजिक सिद्धांताचा उद्‌भव हे समाजशास्त्रीय इतिहासाचे रूप आहे.

**समाजशास्त्राचा उदय :**

अठराव्या शतकाच्या उत्तरार्धात विज्ञानाची प्रगती झपाट्याने होऊ लागली. निसर्गातील भिन्न घटकांचा शास्त्रीय पद्धतीने अभ्यास होऊ लागला आणि त्यातून सर्वसामान्य सिद्धांत शास्त्रज्ञ काढू लागले. भौतिक शाखात वापरल्या जाणाऱ्या शास्त्रीय पद्धतींनी मानवी समाजाचे, त्याच्या विकासाचे अध्ययन करून सार्वकालीन सिद्धांत शोधून काढणे शक्य आहे, अशी काही तत्त्ववेत्त्यांची धारणा बनली. फ्रेंच तत्त्वज्ञ ऑगस्ट कॉम्त याने १८३८ साली हा विचार व्यक्त केला. समाजशास्त्र ह्या संज्ञेचा जनकही कॉम्त हाच आहे. मानवी विकासाचा शास्त्रीय पद्धतीने अभ्यास हा विचार मांडून त्याने इतिहास व समाजशास्त्र यांची निकटता प्रस्थापित केली. ऐतिहासिक घटनांच्या सत्यतेची खातरजमा करून घेतल्यानंतर, भौतिक शास्त्रज्ञाप्रमाणे, इतिहासकाराने घटितांची तर्कनिष्ठरीत्या संगती लावून, कार्यकारण मीमांसा केली तर त्यातून सार्वकालीन स्वरूपाचे सामान्य सिद्धांत शोधून काढता येतील असे ठाम मत त्याने व्यक्त केले. त्यानंतर हर्बर्ट स्पेन्सर ह्या ब्रिटिश तत्त्ववेत्त्याने '*Principles of Sociology*' ह्या ग्रंथात मानवी समाजाच्या विकासाच्या विश्लेषणातून समाजाच्या उत्क्रांतीचा विचार प्रतिपादित केला. 'सोशल डार्विनिझम'चा विचारही मानवी समाजांच्या शास्त्रीय विश्लेषणाची फलश्रुती होती. वस्तुतः मानवी समाजाचा शास्त्रीय पद्धतीने अभ्यास करण्याचा विचार पूर्णतः नवा होता असे नव्हे. चौदाव्या शतकातील सुप्रसिद्ध अरब लेखक इब्न खल्दून याने ही भूमिका घेतली होती. एकाकी ऐतिहासिक घटना मानवी जीवनाचा अर्थ उलगडून दाखवू शकत नाही, त्यासाठी समाजाचे व संस्कृतींचे अध्ययन आवश्यक आहे; समाजाच्या व संस्कृतीच्या विकासाला अनेक बाबी कारणीभूत असतात; सामाजिक व्यवस्था, संस्था यांच्या अध्ययनातून संस्कृतीचे आकलन होते, म्हणून समाजाच्या अध्ययनाला तो शास्त्र म्हणतो. पाश्चात्य जगात एकोणिसाच्या शतकात कॉम्तने मांडलेल्या विचाराचा प्रभाव बौद्धिक जगावर पडला. परंतु भौतिक शास्त्रात वापरल्या जाणाऱ्या अध्ययन पद्धतींचा वापर मानवी जीवनाच्या अध्ययनासाठी करता येईल व त्यातून सर्वसामान्य सिद्धांत काढता येतील ह्या कॉम्तच्या प्रतिपादनाचे खंडन जर्मन विचारवंत विलहेल्म डिल्थे याने केले. त्याच्या मते भौतिक जग हे मानवी समाजाहून सर्वस्वी भिन्न आहे; समाज सजीव आहे, सेंद्रिय आहे, त्याला जाणिवा आहेत, विचार आहेत, मन आहे; त्यामुळे निर्जीव वस्तूच्या अभ्यासासाठी वापरण्यात येणाऱ्या पद्धती समाजाला लावणे श्रेयस्कर व फलदायी ठरणार नाही व त्यातून सामान्य सिद्धांत काढणे धोक्याचे ठरेल असा इशारा त्याने दिला व त्यासाठी वेगळ्या अध्ययन पद्धती वापराव्या लागतील असे मत व्यक्त केले.

**समाजशास्त्र व इतिहासाची सांगड –**

विसाव्या शतकाच्या उत्तरार्धात कॉम्त व डिल्थे यांचे विचार दोन प्रतिभावंत समाजशास्त्रज्ञांनी उचलले. ते दोन समाजशास्त्रज्ञ म्हणजे एमिल डरखाईम आणि मॅक्स वेबर हे होत. इतिहास व समाजशास्त्र यांची सांगड घालण्याचे श्रेय ह्या दोन विचारवंताना दिले जाते. त्यांच्या पूर्वी ह्या भूमिकेतून कार्ल मार्क्सने मानवी समाजाच्या विकासाचे शास्त्रीय पद्धतीने अध्ययन करून ऐतिहासिक भौतिकवादाचा सिद्धांत मांडला. इतिहास व समाजशास्त्र ह्या दोहोंचा समन्वय साधणारे विचारवंत म्हणून कार्ल मार्क्स, एमिल डरखाईम, जॉर्ज सीमेल (*George Simmel),* मॅक्स वेबर यांची नावे लक्षणीय आहेत. जॉर्ज सीमेलने '*The Transcendental Character of Life The Conflict of Modern Culture* ह्या लेखात सामाजिक परिवर्तनामागील कारणांची मीमांसा करताना व्यक्तीच्या मानसिकतेवर भर दिला. जीवनात स्थैर्याच्या गरजेमुळे भोवतालच्या परिस्थितीशी जुळवून घेण्याची व्यक्तीची इच्छा, परंतु त्याचबरोबर स्थैर्यातून निर्माण होणारा रटाळपणा, कंटाळा, विमनस्कता यांतील संघर्ष हे आधुनिक संस्कृतीचे स्वरूप असल्याचे मत तो व्यक्त करतो. इतिहास व समाजशास्त्र परस्पर संलग्न असल्यामुळे दोहोमधील विभाजन रेषा पुसून टाकावी असे मत प्रा. इ. एच्. कार '*What is History*' ह्या प्रसिद्ध ग्रंथात व्यक्त करतात. ते म्हणतात "*The more sociological history becomes and the more historical sociology becomes, the better for both Let the frontier between frontier between them be kept open for two way traffic*" मार्क ब्लॉच, लुसियन फाने या ॲनल्स गटातील इतिहासकारांनी देखील गतकालीन समाजाचा अभ्यास समाजशास्त्रीय दृष्टीने करणे आवश्यक मानले.

**समाजशास्त्रीय इतिहास म्हणजे काय***? :-* इतिहास व समाजशास्त्र यांचा निकटचा संबंध ध्यानात घेतल्यानंतर इतिहासाचा गतकालीन मानवी जीवनाचा समाजशास्त्रीय दृष्टीने अभ्यास कसा करावयाचा? समाजशास्त्रीय दृष्टी म्हणजे काय? असा प्रश्न आपोआपच उपस्थित होतो. याचे उत्तर असे की रानटी भटक्या अवस्थेनंतर स्थिर समाजाची निर्मिती कशी झाली? त्या मागे कोणते घटक होते? समाज एकसंधी आहे की त्यात भिन्न वंशीय लोकसमूह आहेत? त्यांचे परस्पर संबंधांचे स्वरूप काय आहे? त्यांना एकत्र बांधून ठेवणारे समान सूत्र आहे का? त्यांना विभक्त ठेवणारे घटक कोणते? व्यक्ती हा समाजाचा घटक आहे, तेव्हा व्यक्तीव्यक्तीतील किंवा लहान समाजगटांची जीवनपद्धती, राहाणी, चालीरीती, रूढी, परंपरा संस्कृती यांचे स्वरूप काय आहे? समाजाची नीतिमूल्ये कोणती? त्यांचा अवलंब समाज कितपत करतो? कुटुंबसंस्था, विवाहसंस्था अशा सामाजिक संस्था कितपत प्रभावी आहेत? पुरुष-स्त्री संबंधाचे स्वरूप व समाजातील स्त्रीचा दर्जा काय आहे? धार्मिक श्रद्धा कोणत्या आहेत व त्यांचे सामाजिक व्यवस्थेवर कोणते परिणाम झाले आहेत? समाजाची रचना कशी आहे? सामाजिक स्तरीकरण कशा प्रकारचे आहे? नागरी व ग्रामीण जीवनात किती प्रमाणात साम्य व भेद आहे? समाजाच्या भिन्न स्तरांवरील सत्ता केंद्रे कोणती? सामाजिक नियंत्रण ही सत्ता केंद्रे कशी ठेवतात? सामाजिक स्थित्यंतरे कशी होतात? त्यात वैचारिक व मानसिक घटकांची भूमिका काय? सामाजिक नीतिनियमांच्या उल्लंघनामुळे कोणत्या समस्या निर्माण होतात? कोणत्या अनिष्ट प्रवृत्ती प्रचलित होतात? त्यांचे निराकरण कसे होते? असे नानाविध प्रश्न समाजाचा अभ्यास करताना इतिहासकाराने स्वतःला विचारावयाचे असतात व त्याची उत्तरं शोधावयाची असतात, तसेच समाज हा निर्जिव घटक न मानता, त्याचे सजीव सेंद्रीय रूप व त्यातील व्यक्तीची भूमिका यांचे भान ठेवणे आवश्यक असते. सी. डब्ल्यू. मिलस् (*Mills)* यांच्या १९५९ साली प्रकाशित झालेल्या '*The Sociological Imagination*' ह्या ग्रंथात व्यक्ती व समाजाच्या एकत्रित विचारावर भर दिला आहे. म्हणतात "*Neither the life of an individual nor a history of a societycan be understood without understanding both.*" मानव आपला इतिहास स्वतः घडवितो असे मार्क्स म्हणत असला तरी त्याला हवा तसा इतिहास तो घडवू शकत नाही। गतकाळातून जी परिस्थिती अस्तित्वात येते त्या परिस्थितीतच इतिहास घडतो. म्हणून प्रस्थापित सामाजिक व्यवस्थेच्या संदर्भातच मानवी व्यवहारांचा व समाजाच्या मानसिकतेचा विचार आवश्यक ठरतो. तसेच समाजाच्या विकासाच्या प्रक्रियेत सामाजिक संस्थांप्रमाणे आर्थिक रचना, प्रशासकीय व्यवस्था, भांडवलशाही व्यवस्था, बाजारव्यवस्था, नोकरशाही अस्तित्वात येतात; त्यांचा सामाजिक व्यवहारावर प्रभाव पडत

असल्यामुळे त्यांचा अभ्यासही अगत्याचा असतो. मानवी समूहांचे होणारे स्थलांतर (*migration*), त्यामागील मानसिकता, तसेच समाजात अनिष्ट विकृत प्रवृत्ती गुन्हेगारी, भ्रष्टाचार, नीतिमूल्यांचा हास निर्माण होण्याची मीमांसा - या सर्व बाबींचे तर्कशुद्ध विश्लेषण व विवेचन समाजशास्त्रीय इतिहासलेखनात अपेक्षित आहे. ज्ञानाचा विकास देखील विशिष्ट सामाजिक परिस्थितीत घडून येत असल्यामुळे ज्ञानाच्या विकासाचा अभ्यास तत्कालीन सामाजिक परिस्थितीच्या संदर्भात करावा लागेल असे मत डॉ. रोमीला थापर यांनी '*The Hindu*' मधील फेब्रुवारी २००५ च्या अंकातील '*Knowledge and Education*' ह्या लेखात व्यक्त केले आहे. समाजशास्त्रीय इतिहासलेखनाचे काही लाभ ध्यानात आल्यास त्याचे महत्त्व स्वाभाविकच अधोरेखित होते. गतकालीन मानवी व्यवहारांच्या शास्त्रीय अध्ययनामुळे सामाजिक व्यवहारांचे यथार्थ आकलन होते; त्यातील हितकारक गोष्टी तसेच त्रुटी ध्यानात येतात; आणि वर्तमानातील सामाजिक रचनेतील व व्यवहारातील त्रुटी व दोष दूर करण्यास दिशा मिळते. उदाहरणार्थ, असगर अली ह्या समाजवादी विचारवंताने १९९९ सालच्या '*Economic and Political Weekly*' मधील '*Resolving Hindu-Muslim Problem*' ह्या लेखात इस्लामच्या शिकवणुकीचे समाजशास्त्रीय विश्लेषण केले असून त्या शिकवणुकीमागील सामाजिक, शैक्षणिक व राजकीय संवर्ग उलगडून दाखविले आहेत, व इस्लाम धर्माच्या शिकवणुकीबाबत समाजात प्रचलित असलेले अपसमज चुकीचे असल्याचे मत मांडले आहे. विसाव्या शतकातील समाजशास्त्रीय इतिहासलेखनावर ज्या समाजशास्त्रज्ञांचा प्रभाव पडला आणि ज्यांनी ह्या दोन ज्ञानशाखांची सांगड घातली त्यात कार्ल मार्क्स, एमिल हरखाईम व मॅक्स वेबर हे विशेष उल्लेखनीय आहेत. कार्ल मार्क्सने समाजशास्त्रीय दृष्टिकोणातून मानवी जीवनाच्या विकासाचे विश्लेषण करून ऐतिहासिक भौतिकवादाचा सिद्धांत मांडला. एमिल डरखाईमने कॉम्तच्या प्रत्यक्ष ज्ञानवादाच्या आधारे सामाजिक घटकांचा अभ्यासकेला, तर मॅक्स बेबरने प्रत्यक्ष ज्ञानवाद नाकारून डिल्थेच्या भूमिकेवरून सामाजिक विषयांचे विवेचन केलेले आढळते.

**एमिल डरखाईम (*Emile Durkheim:* १८५८-१९१७) :-**

हा फ्रेंच विचारवंत आधुनिक समाजशास्त्राचा जनक म्हणून ख्यातनाम आहे. एक महत्वाची अध्ययनशाखा म्हणून त्याने समाजशास्त्राचा पुरस्कार केला. युरोपातील समाजशास्त्राच्या अध्ययनाचे पहिले अभ्यास केंद्र १८९५ साली बॉर्डाक्स (*Bordeaux*) विद्यापीठात स्थापन करण्यात त्याचा पुढाकार होता. तसेच १८९६ साली प्रकाशित झालेल्या '*Annee Sociologique*' नावाच्या नियतकालिकाचा तो संस्थापक होता. ह्या नियतकालिकातील एक विभाग धर्माच्या समाजशास्त्रीय अध्ययनाला वाहिलेला होता. अशा रीतीने डरखाईमने समाजशास्त्रीय अध्ययनाला संस्थात्मक आधार दिला व समाजशास्त्रज्ञांची पिढी तयार केली. समाजाच्या रचनेच्या त्याने केलेल्या विश्लेषणाचा प्रभाव हेन्री बर, मार्क ब्लॉच सारख्या इतिहासकारांवर पडलेला दिसतो.

मानवी समाज हे भिन्न घटकांचे एकत्र बांधलेले गाठोडे नाही, त्यातील भिन्न घटक परस्पर संलग्न, परस्परावलंबी असतात, एकाचा परिणाम दुसऱ्या घटकावर होणे अनिवार्य असते. समाजाच्या भिन्न घटकांची स्वतःची अशी वैशिष्ट्ये असतात, उपजत निर्धारित कार्य असते, व ते कार्य व्यवस्थितपणे पार पडल्याने समाज संतुलित व निकोप राहातो; असे डरखाईमचे प्रतिपादन आहे. तो आपल्या लिखाणात सामाजिक रचनांचा, व्यवस्थांचा अभ्यास करतो. '*Division of Labour*' ह्या ग्रंथात तो आधुनिक काळातील व त्यापूर्वीच्या काळातील श्रमविभागणीच्या व्यवस्थेचा तौलनिक अभ्यास करतो आणि अलीकडील श्रमविभागणीच्या गुंतागुंतीच्या पद्धतीमुळे सामाजिक जीवनातील व्यक्तिगत संबंधांचे संतुलन संपले आहे व सामाजिक धारणा करणारी बंधने कोलमडून पडत आहेत; असे मत तो मांडतो. '*Elementary Forms of Religious Life*' ह्यात तो मानवी समाजाच्या प्राथमिक रानटी अवस्थेतील समाजाची मानसिकता व व्यक्तिमत्त्व घडविण्यातील धार्मिक निष्ठा व पुराणकथांची भूमिका तपासतो. लोकांच्या धर्मनिष्ठांचे मूळ त्यांच्या सामाजिक कर्तव्याच्या जाणिवेत आढळते; व्यक्तींच्या विचारांचे मूळ समाजाच्या जीवनपद्धतीत असते. काळासारख्या मूलभूत संकल्पना देखील समाजाने निर्माण केलेल्या आहेत; असे प्रतिपादन करून तो सामाजिक रचना व विचार यांतील निकटचा संबंध विशद करतो.

समाजशास्त्रीय दृष्टीने डरखाईमने केलेले धर्माचे विवेचन लक्षणीय आहे. धर्मतत्त्वांचा व धर्मनिष्ठेचा उगम सामाजिकतेत आहे, सामाजिक संबंधात आहे. धर्माचे सामाजिक कार्य आहे, त्यामुळे सामाजिक ऐक्य निर्माण होते, तसेच धर्माला सामाजिक संदर्भ असतो. ईश्वराचा विचार करताना माणूस काही अंशी अप्रत्यक्षरीत्या समाजाचा विचार करीत असतो, असे त्याने धर्माचे समाजशास्त्रीय स्पष्टीकरण दिलेले आढळते. तसेच माणसांच्या मूलभूत विचारांचे समाजशास्त्रीय विश्लेषण व विवेचन तो करतो. ह्या आधुनिक समाजशास्त्रज्ञाने गतकालीन समाजाच्या ऐतिहासिक अभ्यासाला दिशा दिली. विसाव्या शतकातील समाजशास्त्रीय अध्ययनावरच नव्हे तर इतिहासाच्या क्षेत्रावरही त्याच्या विश्लेषण पद्धतीचा दाट ठसा उमटलेला दिसून येतो.

**मॅक्स वेबर (*Max Weber :* १८६४-१९१०) :-**

विसाव्या शतकातील वैचारिक विश्वावर प्रभाव टाकणारा दुसरा समाजशास्त्रज्ञ मॅक्स वेबर हा होय. हा मार्क्सवादी जर्मन विचारवंत राजकीय अर्थशास्त्र, धर्मशास्त्र, भाषाशास्त्र व कायद्याचाही अभ्यासक होता. समाजाच्या अभ्यासाची त्याची भूमिका प्रत्यक्षज्ञानवाद विरोधी आहे. समाज हा गतिमान व सेंद्रीय असल्याने भौतिकशास्त्राच्या अध्ययनपद्धतीचा वापर समाजाच्या अध्ययनासाठी करणे गैर ठरेल ह्या डिल्ये (*Dilthey)* च्या मताचा तो समर्थक आहे. समाजाच्या अभ्यासाचे स्वतंत्र शास्त्र आहे, सामाजिक व्यवहारांचा व माणसाच्या कृतीचा अन्वयार्थ लावून, त्याची कार्यकारण मीमांसा करणे म्हणजे समाजशास्त्र होय अशी तो समाजशाखाची व्याख्या करतो. समाजाच्या रचनांचा अभ्यास करण्याऐवजी तो मानवी कृतीची गुंतागुंत तपासतो, प्रत्येक मानवी कृती समाजाशी संबंधित असते, ही गुंतागुंत व परस्पर संबद्धता लक्षात घेणे हा समाजशास्त्राचा तसेच इतिहासाचा हेतू असावा; असे मतं तो व्यक्त करतो. मार्क्स व डरखाईमहून त्याचा समाजशास्त्रीय विचार काहीसा वेगळा आहे, मार्क्सच्या मते समाजाचे स्वरूप उत्पादनपद्धती व उत्पादन प्रक्रियेतील संबंध निर्धारित फरतात. डरखाईम हा सामाजिक वास्तवावर (*social facts)* भर देतो, त्याचे स्वतंत्र अस्तित्व मानतो, तर वेबर व्यक्ती हा समाजाचा महत्त्वाचा घटक मानून त्याचे समाजातील स्थान तसेच त्याच्या कृतीमागील उद्दिष्टांचे व समाजाशी असलेल्या संबंधांची गुंतागुंत अभ्यासतो; सामाजिक परिवर्तन उत्पादन प्रक्रियेतील बदलांमुळे होत नाही, तर विचार, मूल्ये, धर्मतत्त्वे यांची त्यातील भूमिका तपासतो. मार्क्सने ज्या मुद्यांचा अस्पष्ट निर्देश केला होता, त्यांचे महत्त्व तो प्रतिपादित करतो म्हणून त्याने मार्क्सवादात भर घातली; असे मत काही समीक्षक व्यक्त करतात.

मानवी समाजाचा इतिहास ध्यानात घेता, समाजाची वाटचाल प्रगतीच्या दिशेने होते; हा सिद्धांत वेबर मान्य करीत नाही. विज्ञानाची प्रगती म्हणजे समाजाची प्रगती नसून समाजाच्या अधोगतीचे ते कारण आहे, क्षुद्र साध्यासाठी बुद्धीचा व विज्ञानाचा वापर केला जात आहे, केवळ बुद्धिसामर्थ्य चांगल्या माणसाचे लक्षण नाही, आजचा माणूस वाढते औद्योगिकीकरण, भौतिकवाद व नोकरशाहीच्या सापळ्यात अडकलेला आहे. धनप्राप्तीपलीकडे उद्दिष्ट उरलेले नाही. संस्कृतीला अर्थ उरलेला नाही, समाज आतून कुजतो आहे अशी वैफल्याची भावना तो व्यक्त करतो. ह्या हासाच्या स्थितीतून समाजाला बाहेर काढणारा एक आशेचा किरण तो दर्शवितो तो म्हणजे एखाद्या प्रेषिताचा किंवा आदर्श विचारप्रणालीचा उदय हा होय.

वेबरने प्रामुख्याने तीन विषयांचा सखोल अभ्यास केला. पहिला म्हणजे धार्मिक विचारांचा आर्थिक व सामाजिक जीवनावरील प्रभाव, दुसरा समाजाचे भिन्न स्तर व धार्मिक संकल्पना यांचा अन्योन्य संबंध आणि तिसरा म्हणजे आजच्या पाश्चात्य समाजाच्या स्वरूपाचे व वैशिष्ट्यांचे विश्लेषण हे होत. याशिवाय भांडवलवादाचा उदय व विकास, नोकरशाहीचे आजचे स्वरूप, लोकशाहीचे भ्रामक स्वरूप व सत्ताकेंद्राचे वर्गीकरण ह्या विषयांवरही त्याचे लिखाण चिंतनीय आहे. त्याने प्रारंभी औद्योगिक समाजाचा शास्त्रीय अभ्यास केला व नंतर धर्माची आणि सत्तेच्या संकल्पनेची समाजशास्त्रीय चिकित्सा केली.

मॅक्स वेबरच्या (*The Protestant Ethic and the Spirit of Capitalism'* ह्या सुप्रसिद्ध ग्रंथात तो धर्माचे समाजशास्त्रीय स्वरूप विशद करतो व त्याचा भांडवलवादाच्या उदयाशी असलेला संबंध उलगडून

दाखवितो. '*Politics as a Vocation*' ह्या ग्रंथात तो सत्तासिद्धांताचे मर्म उलगडून दाखवत असताना बलशक्तीचा कायदेशीर वापर करण्याची मक्तेदारी असलेली संस्था; असे राज्यसंस्थेचे वर्णन करतो. '*The Religion of India*' आणि '*The Religion of China*' हे त्याचे वैशिष्ट्यपूर्ण ग्रंथ होत. पहिल्या ग्रंथात हिंदू व बौद्ध धर्माच्या वैशिष्ट्यांचा उहापोह करताना भारतीय समाजाच्या रचनेचे तो चिकित्सक विश्लेषण करतो व धर्मतत्त्वांचा समाजाच्या नीतिमूल्यांवर झालेला परिणाम विशद करतो. तसेच भारतीय धार्मिक व सामाजिक रचनेची तुलना चीनवरील ग्रंथात तो चीनच्या धार्मिक व सामाजिक व्यवस्थेशी करतो. समाजाच्या ऐतिहासिक परिवर्तनाशी धर्म, नीतिमूल्ये, विचार यांचा निकटचा संबंध असल्याची त्याची धारणा आहे. समाजाचा अभ्यास करताना व्यक्तीचा, व्यक्तीच्या कृतीचा व त्यामागील मानसिकतेचा व उद्दिष्टाचा विचार अगत्याचा असल्याचे ठामपणे प्रतिपादित करणारा व तसे करून समाजशास्त्र व इतिहासाला जोडणारा विचारवंत म्हणून मॅक्स वेबरच्या लिखाणाचा अभ्यास इतिहासासाठी मोलाचा ठरतो.

## परिस्थितिकी व इतिहास (*Ecological Approach to History*)

एकोणिसावे शतक हे इतिहासाचे क्षेत्र व्यापक होण्याच्या दृष्टीने महत्त्वाचे शतक होते. ह्या कालावधीत इतिहासलेखनाच्या सर्वच अंगांत आमूलाग्र बदल झाला. इतिहास लेखनाची शास्त्रीय पद्धती रूढ झाली. इतिहास म्हणजे केवळ राजकीय घडामोडी किंवा महान व्यक्तीच्या कार्याचा आलेख नाही; किंवा मानवी जीवनाच्या एखाद्या अंगाचा विचार मानवी जीवनाचे साकल्याने दर्शन घडविण्यास पुरेसा नाही; मानवी जीवन विविधांगी आहे, आणि ही सर्व अंगे स्वायत्त नसून परस्परावलंबी व परस्परनिगडित आहेत; मानवी समाज सजीव असल्याने, त्यात स्थित्यंतरे घडतात व समाजजीवन गतिमान बनते; असा मानवी समाजाकडे पाहण्याचा सर्वंकष दृष्टिकोण ह्या काळात विकसित झाला व त्या भूमिकेतून मानवी समाजाचा अभ्यास करण्यास चिकित्सक इतिहासकार पुढे सरसावले. मानवी जीवनात व समाजात बदल घडण्यास अनेक बाह्य घटक कारणीभूत असतात ह्या जाणिवेतून विविध मानव्यशास्त्रांचा, मानवी जीवनाशी निगडित असलेल्या विद्याशाखा व इतिहास यांचा अन्योन्य संबंध तपासून पाहिला जाऊ लागला. अर्थशास्त्र, समाजशास्त्र, मानसशास्त्र यांच्याप्रमाणे निसर्गशास्त्राचा इतिहासाशी मानवी जीवनाशी निकटचा केवळ नव्हे तर अतूट संबंध असल्याचे इतिहासकारांना जाणवू लागले व ह्या जाणिवेतून परिस्थितिकी अगर प्रकृतिविज्ञानाच्या दृष्टिकोणातून गतकालीन मानवी जीवनाचा, गतकालीन मानवी समाजातील स्थित्यंतरांचा, विकासाचा अभ्यास इतिहासकार करू लागले. आज हा विचारप्रवाह सर्वमान्य झालेला असून अनेक सामाजिक विचारवंत व इतिहासकार परिस्थितीविज्ञानाच्या दृष्टिकोणातून मानवी समाजाचा अभ्यास करीत आहेत. परिस्थितिकी / परिस्थितीविज्ञान (*Ecology*) म्हणजे काय?:- मानव हा निसर्गाचा अविभाज्य घटक आहे. ह्या दोहोतील नात्याचे स्वरूप समजून घेण्यासाठी प्रथम परिस्थितीविज्ञान किंवा निसर्गविज्ञान म्हणजे काय? व त्याचा मानवी जीवनाशी काय व कसा संबंध आहे याचे स्पष्ट आकलन करून घेणे आवश्यक आहे. निसर्ग विज्ञान हे निसर्गातील भिन्न घटकांचे व त्यांच्या परस्पर संबंधांच्या अध्ययनाचे शास्त्र होय. इकॉलॉजी हा शब्दप्रयोग काही अभ्यासकांच्या मते जर्मन प्राणिशास्त्रज्ञ राईटर (*Reiter*) याने प्रथम वापरला, तर काही अभ्यासक हे श्रेय जर्मन शास्त्रज्ञ हेकेल (*Haeckel*) याला देतात. हेकेल ह्या जीवशास्त्रज्ञाने १८६६ साली बर्लिनमध्ये प्रकाशित केलेल्या आपल्या पुस्तकात इकॉलॉजी शब्दाची व्याख्या केली व त्याची उकलही केली. यापूर्वी डार्विनचा 'ओरिजिन ऑफ स्पेसीज' हा ग्रंथ प्रकाशित झाला होता. त्या संदर्भात हेकेलने असे विधान केले की, 'डार्विनच्या सिद्धांतानुसार जीवनसंघर्षाच्या प्रक्रियेतील सर्व संबंधित घटकांच्या परस्परसंबंधांचा अभ्यास म्हणजे परिस्थितिकी होय. सर्व प्राणिमात्रांचे परस्परांशी, वनस्पतींशी व ज्याच्या ते प्रत्यक्ष वा अप्रत्यक्षपणे संपर्कात येतात त्याचा आभ्यास परिस्थितीशास्त्र करते.' हे शाख जीवशास्त्राची एक शाखा आहे. इकॉलॉजी ह्या शब्दाचे मूळ *Oikos* व *Logos* ह्या ग्रीक शब्दांत आहे. *Oikos* म्हणजे निवासाचे किंवा वास्तव्याचे स्थान आणि *Logos* म्हणजे अभ्यास. म्हणून स्थूलमानाने याचा अर्थ प्राणिमात्राचा त्याच्या निवासस्थानाच्या संदर्भात अभ्यास असा होतो. हा विषय अतिशय व्यापक व गुंतागुंतीचा असल्यामुळे परिस्थितीविदांनी केलेल्या त्याच्या वेगवेगळया व्याख्या ध्यानात घेणे विषयाच्या सम्यक् आकलनासाठी सोयीचे ठरते. फ्रेडरिक क्लेमंटस, हा इकॉलॉजी हे प्राणिमात्रांच्या अभ्यासाचे शास्त्र

आहे असे म्हणतो. इ.पी. ओडम ह्या शब्दाची व्याख्या 'निसर्गाची रचना व तिच्या कार्यपद्धतीच्या अध्ययनाचे शास्त्र असून ते मनुष्य व पर्यावरणाच्या संपूर्ण ऐक्यावर आधारले आहे' अशी करतो. 'संपूर्ण जीवमात्राच्या अंतर्संबंधाचा व भौतिक पर्यावरणाशी असलेल्या त्याच्या संबंधाचा अभ्यास म्हणजे प्रकृतिविज्ञान' असे वर्णन सत्येश चक्रवर्ती करतात. थोडक्यात म्हणजे निसर्गाचे जे भिन्न घटक आहेत, त्यांच्या परस्परसंबंधांची, परस्परावलंबित्वाची, सहकार्याची व परस्पर हितकारक सहअस्तित्वाची प्रक्रिया हे इकॉलॉजीच्या अभ्यासाचे क्षेत्र होय. परिस्थितिकीचे स्वरूप :- निसर्गशास्त्रात पाच घटकांच्या मिळून बनलेल्या निसर्गाचा अभ्यास अपेक्षित असतो. निसर्गातील पाच घटकांपैकी तीन निर्जीव व दोन सजीव आहेत. निर्जीव मध्ये जल, वायू व भूमी यांचा तर सजीवमध्ये वनस्पती व प्राणिमात्राचा अंतर्भाव होतो. यांपैकी कोणताही घटक स्वायत्त नाही. सर्व घटक मानव देखील परस्परसंबंधित व परस्परावलंबी आहेत. प्राणिमात्राला त्याच्या भोवतालच्या परिस्थितीपासून विलग करता येत नाही. अलीकडे केवळ पृथ्वीवरील परिस्थितीच नव्हे तर वायुमण्डलाच्या स्थितीचाही जीवमात्राशी निकटचा संबंध असल्याचे शास्त्रज्ञांनी सिद्ध केले आहे. याला *biosphere* जैवमण्डल असे म्हणतात. सजीव जगात एक शृंखलाबद्ध व्यवस्था आहे. निसर्गातील सर्व घटकांचे अस्तित्व कायम टिकण्यासाठी व निसर्गाचे कार्य सुव्यवस्थितपणे चालण्यासाठी ही शृंखला अखंड चालावी लागते. त्यात खंड पडल्यास निसर्गात असंतुलन निर्माण होऊन भिन्न घटकांना धोका निर्माण होतो. सजीव विश्वातील निर्धारित व्यवस्थेला *ecosystem* असे म्हणतात. सजीव घटकांना म्हणजे वनस्पती व प्राणिमात्रांना निसर्ग खाद्य पुरवितो. हे खाद्य पुढील प्रक्रियेने मिळते. सूर्य पृथ्वीला ऊर्जा पुरवतो. ह्या ऊर्जेचे रूपांतर वनस्पती रासायनिक ऊर्जेत करतात व वातावरणातील कार्बन डायऑक्साइड रासायनिक ऊर्जा + पाणी यांच्या पासून तयार होणारे कार्बोहैड्रेस् वनस्पती साठवून ठेवतात. ह्या प्रक्रियेला फोटोसिन्थेसिस म्हणतात. वनस्पतीवर जगणारे प्राणी त्यातील कार्बोहैड्रेटपासून काही ऊर्जा मिळवतात. वनस्पती व प्राणी खाणाऱ्या माणसाला त्यांपासून ऊर्जा मिळते. ह्या शृंखलेतील प्रत्येक कडीत ऊर्जा कमी होत जाते. पाणी व हवेच्या प्रदूषणाने ह्या शृंखलेत खंड पडतो व निसर्गाच्या व्यवस्थेवर अनिष्ट परिणाम होतो. नैसर्गिक परिस्थितीतील घटकांची विविधता कायम राहिली तर इकोसिस्टिम संतुलित राहाते. नैसर्गिक परिस्थितीत असंतुलन निर्माण झाले की त्याच्याशी संबद्ध असलेल्या मानवी जीवनावर अनिष्ट परिणाम होऊन समस्या निर्माण होतात. निसर्गात बदल होत नाहीत असे नाही. बदल हा निसर्गनियम आहे. परंतु निसर्गात स्वाभाविकरीत्या होणाऱ्या बदलांशी त्यातील घटक जुळवून घेतात. बदल सुसह्य करण्यासाठी सजीवांना निसर्गच मदत करतो. उदाहरणार्थ; अतिथंडीच्या प्रदेशांतील प्राणी केसाळ असतात. दाट केस थंडीपासून त्यांचे रक्षण करतात. परंतु निसर्गातील शृंखलेत एकाएकी बदल करण्याचा मानवाने प्रयत्न केल्यास त्याचे दुष्परिणाम होतात. उदाहरणार्थ; शेतात पीक आले की किडे व चिमण्या येतात, त्यांना खायला ससाणे व मांजरी येतात. कीटक येऊ नयेत म्हणून कीटकनाशक रासायनिक फवारे मारल्याने कीटक गेले, त्याबरोबर चिमण्याही गेल्या व ससाणेही गेले. चीनमध्ये असा एक प्रयोग झाला. शेतातल्या चिमण्या घालविण्यासाठी सतत मोठ्याने झांज वाजविण्यात आले. त्यामुळे काही चिमण्या उडून गेल्या, काही श्रमाने मरून पडल्या, चिमण्या गेल्यामुळे कीटकांची संख्या वाढली व पीक नष्ट झाले. अशी ही नैसर्गिक शृंखला मोडण्याच्या दुष्परिणामांची उदाहरणे निदर्शनास आली. निसर्गाची व्यवस्था :- शास्त्रज्ञांनी निसर्गाच्या व्यवस्थेचे स्वरूप पुढीलप्रमाणे मांडले आहे.

१) निसर्गात एक ऊर्जा वर्तुळ (*Energy circuit)* आहे. ही ऊर्जा एका घटकाकडून दुसऱ्या घटकाकडे संक्रमित होत असते.

२) निसर्गातील घटकांच्या परावलंबित्वाची एक निश्चित उतरंड ठरलेली आहे. त्याला *(Biotic pyramid* म्हणतात.

३) निसर्गात *food webs* म्हणजे खाद्याची शृंखला ठरलेली आहे. त्यातील एक

कडी दुसऱ्या कडीशी संलग्न आहे.

४) जीवंत राहण्यासाठी एक प्राणी दुसऱ्याचे भक्षण करतो, याला *predation* म्हणतात.

५) निसर्गातील बदल नैसर्गिकरीत्या संथगतीने, उत्क्रांतीच्या मार्गे होत असतात. तर मानव करीत असलेले बदल झपाट्याने होतात. हे *Evolutionay vs Human made Change* होत. मानव झपाट्याने निसर्गातील घटकांचा वापर करीत असल्यामुळे नैसर्गिक -रीत्या संथपणे होणारे बदल त्यांच्याशी ताळमेळ ठेऊ शकत नाही. त्यामुळे असंतुलन निर्माण होते. नैसर्गिक घटकांची कमतरता निर्माण होते, प्रदूषणासारखे प्रश्न निर्माण होतात.

निसर्गातील असंतुलनाचे धोके निसर्गातील सर्व तत्त्वांच्या संतुलनाने पृथ्वीवरील जीवन सुखकर होते. प्रकृती हा मानवी जीवनाचा मूलाधार आहे. निसर्गाचा उपयोग मानवी प्रगतीसाठी अनादी काळापासून करण्यात आला. मात्र बेसुमार औद्यागिकीरण, आत्यंतिक नागरीकरण, तांत्रिक व वैज्ञानिक विकास यांसाठी निसर्गाचा अविवेकी व अतिरेकी वापर होत असल्यामुळे निसर्गातील संतुलन नष्ट होऊन पर्यावरण दूषित झाले आहे. पृथ्वीवरील जीवजंतूंच्या नव्हे तर मानव जातीच्या विनाशाचे भय निर्माण झाले आहे. उपयुक्त वनस्पतीच्या अनेक जाती, पक्ष्यांच्या व प्राण्यांच्या जाती नष्ट होत आहेत. याच्या दुष्परिणामामुळे मानवी जीवनही संपुष्टात येण्याची, गंभीर आपत्ती ओढविण्याची शक्यता जीवशास्त्रज्ञ बोलून दाखवीत आहेत. यामुळे अलीकडे पर्यावरण शुद्धीची चळवळ जोम धरीत आहे. १९६२ साली श्रीमती रॅचेल कार्सन ह्या अमेरिकन विदुषीने पर्यावरणाला असलेला धोका दर्शविणारे '*The Silent Spring*' हे प्रकाशित केलेले पुस्तक पर्यावरण चळवळीचा आधारग्रंथ मानला जातो. विषारी रसायनांचा वापर, अनिष्ट धातूंचा वापर, युद्धात वापरली जाणारी स्फोटके, परमाणू चाचण्या या सर्वांचे गंभीर धोके त्यांनी निदर्शनास आणून दिले. उपाययोजना :- ह्या समस्येचे गांभीर्य व निकड लक्षात घेऊन यूनो तर्फे १९७२ साली आंतरराष्ट्रीय स्तरावर विचारविमर्ष व उपाययोजनेचे प्रयत्न सुरू झाले. त्यासाठी नैरोबीला आंतरराष्ट्रीय कार्यालय स्थापन करण्यात आले. भारत सरकारने देखील चौथ्या पंचवार्षिक योजनेच्या वेळी पर्यावरणाच्या शुद्धतेचे भान राखून विकासाच्या योजना आखण्यात याव्यात अशी सूचना राज्यांना दिली. आणि १९७२ साली राष्ट्रीय पर्यावरण आयोजन व समन्वय समिती स्थापन केली. १९८० साली त्या समितीचे नामकरण 'राष्ट्रीय पर्यावरण आयोजन समिती.' असे करण्यात आले. सामुद्रिक पर्यावरणाचा देखील विचार झाला. आश्चर्याची बाब अशी की पर्यावरण रक्षणाचा विचार सम्राट अशोक व छत्रपती शिवाजी यांनी केला असल्याचे अभ्यासकांनी निदर्शनास आणून दिले आहे. तसेच भारतावर इंग्लिश ईस्ट इंडिया कंपनीचे शासन असताना १८५२ साली तीन अधिकाऱ्यांनी कंपनी सरकारला एक अहवाल सादर करून भारतातील अमोल नैसर्गिक संपत्तीचा अविवेकी वापर केल्यास हवामान बदलण्याचा व दुष्काळ व रोगराई पसरण्याचा धोका दर्शविला होता आणि ते टाळण्यास आवश्यक ते कायदे करण्यास सुचविले होते. नैसर्गिक परिस्थिती व इतिहासाचा संबंध काय? : मानव हा निसर्गाचा अविभाज्य भाग आहे. मात्र इतर प्राणिमात्रांहून तो वेगळा आहे. त्याला बुद्धीचे देणे लाभले आहे, तो सृजनशील आहे. यांबा वापर करून मानवी जीवन सुखकर करण्यासाठी तो निसर्गातील घटकांचा उपयोग अनादी काळापासून करतो आहे. निसर्गातील घटकांचा वापर करून तो आपल्या जीवनात बदल घडवून आणतो व त्यामुळे निसर्गातही आपोआपच बदल घडून येतो. या उलट निसर्गात बदल झाला की त्याच्या परिणामाने मानवी जीवन पद्धतीत बदल होतो. उदाहरणार्थ; घरे बांधण्यासाठी माणसाने डोंगर फोडून तेथून दगड काढले; त्यामुळे डोंगर नष्ट झाले व त्यावरची झाडी गेली आणि भूमी सपाट झाली. अशा प्रकारे मानवी कृतीमुळे निसर्ग बदलला. याउलट एखादी नदी आटली तर त्यालगतची लोकवस्ती कमी होते, पाण्याच्या शोधात लोक स्थलांतर करतात. अशा प्रकारे मानवी जीवन व निसर्ग हे परस्परांना प्रभावित करतात. ह्या संदर्भात विलिंग्ज हा जीवशास्त्रज्ञ म्हणतो की, 'वनस्पती व प्राणी जग यांचा पर्यावरणाशी असलेला संबंध जाणून घेतल्यास विशिष्ट समाज कोठे व कसा राहिला आणि कसा विकसित झाला याचे ज्ञान होते." मानवी संस्कृती निसर्गनिर्भर आहे हा मुद्दा अनेक विद्वानांनी अधोरेखित केला आहे. '*Theory of Cultural Change*' ह्या आपल्या पुस्तकात ज्यूलियन स्टीवर्ड म्हणतात, "*It is assumed that culture and natural areas are generally coterminus, because culture represents adjustments to particular environment,*" म्हणजे मानव भोवतालच्या नैसर्गिक परिस्थितीशी जुळवून घेत संस्कृती निर्माण करतो. स्टीवर्ड असेही विधान करतो की, 'दोन समान नैसर्गिक परिस्थिती अस्तित्वात असल्यास त्या जगाच्या भिन्न भागात असल्या तरी तेथील मानवी गटांची परिस्थितीला जुळवून घेण्याची क्रिया सारखी दिसते.' एल्.एन्. बिनफोर्ड या लेखकाने "*An Archaeological Perspective* हह्या ग्रंथात संस्कृती व निसर्गाच्या परस्परावलंबित्वाच्या

संदर्भात केलेले, "*Culture is an extrasomatic means of adaptative system that is employed in the integration of society with its environment and with other socio-cultural systems*" हे विधान समर्पक आहे. व्ही. गॉर्डन चाईल्ड ह्या प्रख्यात पुरातत्त्वविदानेही "*The Most Ancient East*" ह्या ग्रंथात मानवी संस्कृतीच्या विकासात परिस्थितिकीची महत्त्वाची भूमिका असल्याचे मत आग्रहाने मांडले आहे. भारतातही विद्वान अभ्यासकांनी ऐतिहासिक पुराव्यांच्या आधारे पुरातनकालीन नैसर्गिक परिस्थितीचे आडाखे बांधले आहेत. ह्या क्षेत्रात पुण्याच्या डेक्कन कॉलेजच्या पुरातत्त्व विभागाने, अहमदाबादच्या फीजीकल रीसर्च लेबॅरेटरीने, नागपूर विद्यापीठाच्या पुरातत्त्व विभागाने मोलाचे कार्य केले आहे. पुरातत्त्वशास्त्र हे प्राचीन मानवी जीवन व तत्कालीन नैसर्गिक परिस्थिती यांच्या परस्परावलंबित्वावर प्रकाशझोत टाकण्यास उपयुक्त ठरते. पुरातत्त्वविद्येचा गाढा व्यासंग असलेल्या डॉ. म. के. ढवळीकर यांनी 'पुरातत्त्वविद्या' ह्या आपल्या ग्रंथात निसर्ग व इतिहास यांच्या अन्योन्य संबंधाचे विस्ताराने स्पष्टीकरण दिलेले आहे. नैसर्गिक स्थिती व गतकालीन मानवी जीवन म्हणजेच इतिहास, यांच्या परस्परप्रभावाचा अभ्यास तीन प्रकारांनी करता येईल. एक तर नैसर्गिक स्थितीने मानवी जीवनाचे स्वरूप कसे निर्धारित कले। आजही कसे करते, याची असंख्य उदाहरणे दृष्टीस पडतात. उदाहरणार्थ; भूकंपाच्या सततच्या संभावनेमुळे जपानमध्ये दगड व सिमेंट घर बांधणीसाठी न वापरता सहज उभारता येणाऱ्या बांबूची घरे बांधतात. इंग्लंड अथवा रशियातील सतत होणाऱ्या हिमपाताच्या अगर अतिवृष्टीच्या प्रदेशात निमुळत्या छपरांची घरे आढळून येतात. अनादी काळापासून नद्यांच्या काठाने मानवी गटांनी वस्ती केल्याची अनेक उदाहरणे आढळतात. जंगलात वास्तव्य करणाऱ्या वन्य जमातींची जीवनपद्धती ही नागरी जीवनपद्धतीहून भिन्न असते. डॉ. शिरीन मुसवी यांनी '*Man & Nature in Mughal India*' ह्या आपल्या अभ्यासपूर्ण ग्रंथात नैसर्गिक परिस्थितीने मुघल काळात जीवनपद्धती आणि आर्थिक व व्यापारी व्यवहारांचे स्वरूप कसे निर्धारित केले याची अनेक उदाहरणे दिलेली आढळतात. त्यांनी ह्या संदर्भात एक लक्षणीय उदाहरण दिले आहे. त्या म्हणतात गोवळकोंडानजीकच्या जंगलात बकऱ्यांच्या पोटात *bezoar* नावाचा मौल्यवान खडा मिळत असे. मात्र त्या बकऱ्यांना वेगळ्या जंगलात नेल्यानंतर तो खडा मिळेना. तसेच तिबेट व लडाकच्या भागात काही हरिणांच्या पोटात कस्तूरी सापडत असे, मात्र त्यांचे निवासस्थान बदलल्यावर ती मिळेनाशी झाली. याचा अर्थ असा नैसर्गिक स्थितीचा मानवासहित सर्वच प्राणिमात्रांवर परिणाम होत असतो.

या संदर्भातील दुसरा मुद्दा असा की, पुरावशेषांच्या गतकालीन मानवाने ज्या वस्तूंचे अवशेष मागे ठेवले आहेत त्यांच्या मदतीने तत्कालीन नैसर्गिक परिस्थिती बद्दल, हवामान, जमीन, पिके, वनस्पती यांबद्दल आडाखे बांधता येतात. उत्खननातून सापडलेल्या खापरांचा अभ्यास केल्यास त्यासाठी कोणती माती वापरली, त्यात आणखी कोणत्या गोष्टी मिसळल्या व त्या गोष्टी कोठे सापडतात याचा अंदाज केला जातो. धान्याचा भुसा व धान्याच्या अवशेषावरून तत्कालीन शेतकरी कोणत्या पिकांची लागवड करीत असावा, तेथील माती कशी असावी, हवामान कसे असावे ते कळते. भांड्यावर चित्रित केलेल्या पशुपक्षांच्या चित्रावरून त्या भागात ते प्राणी वास्तव्य करीत असावे याचे निदान करता येते. उत्खननात सापडलेल्या प्राण्यांच्या हाडांवरून तेथे कोणते प्राणी असावेत याचा अंदाज बांधता येतो. तीन हजार वर्षांपूर्वी मध्यमहाराष्ट्रात तोटी असलेला लोटा सापडला. त्यावरून तेथे पाण्याची कमतरता असावी असा अंदाज करण्यात आला. प्राचीन काळातील घरांच्या बांधकामावरून व बांधकामासाठी वापरलेल्या साहित्यावरून तेथील हवामानाचा व तेथे उपलब्ध असलेल्या वस्तूंची माहिती मिळते. मानवी पशुंच्या सांगाड्यावरून त्यांच्या स्थलांतराचे आडाखे बांधता येतात व मानवाच्या वांशिक स्थितीची माहिती मिळते. तसेच घरबांधणीसाठी वापरले जाणारे लाकूड, अगर रोगावरील औषधी वनस्पतीजगाची माहिती देतात. हडप्पा येथे देवदार लाकडाची शवपेटी सापडली. त्यावरून सिंधू संस्कृतीच्या लोकांनी हिमालयाच्या पायथ्याशी उगवणारे देवदार वृक्ष उपयोगात आणल्याचे अनुमान निघते. काही पक्षी ठराविक ऋतूत विशिष्ट प्रदेशात राहातात. त्यांच्या स्थलांतरावरून तेथील हवामानाचा अंदाज बांधता येतो. डॉ. गुरूदीपसिंग यांनी राजस्थानातील परागांचा अभ्यास करून दहाहजार वर्षांतील तेथील हवामानाचा अंदाज बांधला आहे.

प्राचीन इतिहासातील काही समस्यांची उत्तरे नैसर्गिक स्थितीतील स्थित्यंतरात सापडतात. अशा समस्यांची दोन महत्त्वाची उदाहरणे म्हणजे सिंधू संस्कृतीचा अंतं आणि सरस्वती नदीचा लोप ही होत. सिंधू संस्कृतीच्या हासाची, आर्यांच्या आक्रमणासारखी अनेक कारणे दिली गेली. अलीकडे ह्याला नैसर्गिक कारण घडल्याचे मत आर्.एल्.रेक्स यांनी '*Water, Weathers and Prehistory*' ह्या आपल्या पुस्तकांत व्यक्त केले आहे. ते म्हणतात की, सिंधू नदीला आलेल्या प्रचंड पुरामुळे मोहेंजोदाडो नष्ट झाले. आणि हा पूर अतिवर्षेमुळे नव्हे तर भूकंपाने झाला, ह्या नदीचे पाणी जेथे समुद्रात पडते तेथे जमिनीचा स्तर भूकंपाने उंचावल्यामुळे नदीचे पाणी मागे गेले व त्यामुळे शहर बुडाले. सरस्वती नदी लुप्त होण्याचे कारण रेक्स देतात ते असे की, ख्रि.पू. तिसऱ्या सहस्रकात यमुनेचे पाणी सरस्वती नदीत पडायचे. ख्रिस्तपूर्व दुसऱ्या सहस्रकात ते गंगेत पडू लागले. त्यामुळे सरस्वती कोरडी झाली व लुप्त झाली, व तेथील लोकवस्त्या स्थलांतरित झाल्या. अशा प्रकारे नद्यांचे प्रवाह बदलल्याने तसेच मोठ्या प्रमाणात जंगलतोड झाल्याने जनजीवनात बदल घडल्याचे निदर्शनास येते; कारण जेंव्हा मानवी गरजा व नैसर्गिक साधने यांचा ताळमेळ बसतो तेव्हाच मानवी गट तेथे स्थायिक होतात.

ह्या विषयाच्या संबंधी आणखी एक ध्यानात घ्यावयाचा मुद्दा म्हणजे ऐतिहासिक साहित्यात मानवी जीवनपद्धती व प्राणी जीवनाबाबत जे उल्लेख सापडतात, त्यावरून त्या भागातील नैसर्गिक परिस्थितीचा अंदाज बांधता येतो. असा प्रयत्न डॉ. शिरीन मुसवी ह्या अलिगढ़ विद्यापीठातील प्राध्यापिकेने केला आहे. ज्या प्रदेशात हत्तींचे कळप असल्याचा उल्लेख मुस्लिम इतिहासकारांनी केला आहे, त्या नजीक घनदाट अरण्य होते, किंवा ज्या भागात उंटांचा उल्लेख आहे तेथे वाळवंटी भाग असल्याचा अंदाज बांधण्यात आला. मुघल शासनकाळात गढ़ा मंडल्याचा भाग विशेष सुपीक असल्याचा उल्लेख सापडतो. त्याचे कारण त्याच्या नजीक असलेला जंगली प्रदेश हे होते; कारण त्यामुळे जमिनीचा ओलावा टिकून राहात होता. त्या काळात जी उत्पादने होत व ज्या वस्तूंची निर्यात होई त्यावरून तेथील नैसर्गिक संपत्तीची माहिती होते. उदाहरणार्थ; लाख, मध, मेण, चंदनाचे लाकूड, रेशीम, कस्तूरी इत्यादी. इतिहास व निसर्गाची जवळिक ध्यानात येण्यास ही उदाहरणे बोलकी आहेत. निसर्ग रक्षणाची व संवर्धनाची निकड मानवी जीवनाचा निसर्गाशी अतिनिकट संबंध असल्यामुळे किंबहुना नैसर्गिक परिस्थिती हा मानवी जीवनाचा मूलाधार मूलाधार असल्यामुळे असल नैसर्गिक परिस्थितीच्या रक्षणाची व संवर्धनाची महती मानवी मनावर बिंबवण्याचा आटोकाट प्रयत्न सुरू झाला आहे. याच दृष्टीने '*Ecology and Sustainable Development*' ह्या ग्रंथात पी. एस्. रामकृष्णन् ह्या अभ्यासकाने "*Building bridges with Nature has therefore to be through links established between ecological, social, cultural and ethical dimensions involved in resource management and sharing,*" असे मत व्यक्त केले आहे. उत्तरांचल राज्यातील 'चिपको' आंदोलनाचे प्रवर्तक व समाजचिंतक सुन्दरलाल बहुगुणा यांनीही निसर्गाच्या रक्षणाचा व संवर्धनाचा विचार आग्रहाने मांडला आहे. त्यांनी वारंवार असे म्हटले आहे की, निसर्गाने मानवाला ज्या जीवनावश्यक गोष्टी दिल्या आहेत, त्या ऑक्सीजन, पाणी, अन्न, निवारा इत्यादी, निसर्ग सतत देत राहण्यास व मानवी गरजा पूर्ण करण्यास निसर्गाला सक्षम राखणे यासाठी नैसर्गिक घटकांचे संरक्षण व विकास निकडीचा आहे.

ह्या दृष्टिकोणाची आत्यंतिक गरज आज मानवाला जाणवत आहे आणि म्हणून यावर गांभीर्याने विचारविमर्ष होत आहे. इंग्लंडमध्ये '*Environment and History*' ह्या मथळ्याचे नियतकालिक जॉन क्लार्क व पीटर कोटस् हे संपादित करीत आहेत. भारतातही यावर मौलिक लेखन होत आहे.

## इतिहासाबाबतचा संरचनावादी दृष्टिकोण
## *(Structural Approach to History)*

विसाव्या शतकात पाश्चात्य जगातील ज्ञानशाखांत जे नवे विचारप्रवाह व ज्या नव्या अध्ययनपद्धती रूढ झाल्या, त्यांपैकी एक संरचनावाद ही होय. ह्या प्रवाहाने अध्ययनाचा नवा दृष्टिकोण, नवा मार्ग, नवी दिशा पुरस्कृत केली. पहिल्या महायुद्धाच्या सुमारास उगम पावलेला हा प्रवाह दुसऱ्या महायुद्धानंतर अधिक प्रभावी बनला. अनेक प्रतिभावंत लेखक ह्या विचारप्रणालीने प्रभावित झाले. एकोणिसशे सत्तरच्या दशकात याच विचारप्रणालीने काहीशा भिन्न विचारप्रवाहांना जन्म दिला. यामुळे दुसऱ्या महायुद्धानंतरचा अर्धशतकाचा काळ हा पाश्चात्य बौद्धिक जगात वैचारिक खळबळ माजविणारा, नवे नवे विचारप्रवाह प्रचलित करणारा काळ ठरला.

संचरनावादी दृष्टिकोण हा विसाव्या शतकापर्यंत पाश्चात्य जगातील बौद्धिक क्षेत्रात 'प्रभावी असलेल्या 'पॉझिटिविझम' विरुद्धची प्रतिक्रिया होती. एकोणिसाव्या शतकात प्रयोगनिष्ठ ज्ञानप्राप्तीवर बुद्धिवंतांचा भर होता. मानवी जीवनाचा अभ्यास शास्त्रीय पद्धतीने करून त्यातून भौतिक शास्त्राप्रमाणे काही सार्वकालिक तत्त्वे शोधून काढण्याचा मानव्यशास्त्राचे अभ्यासक प्रयत्न करीत होते. इतिहासाच्या क्षेत्रात पॉझिटिविस्ट (प्रत्यक्षज्ञानवाद) तत्त्वज्ञानाने वस्तुनिष्ठ लिखाणाचे महत्त्व अधोरेखित केले. पुराव्यांच्या आधारे गतकाळ जसा दिसेल, तसेच गतकालीन घटनांचे वर्णन इतिहासकाराने करणे अपेक्षित होते. गतकालीन वास्तवाचे वस्तुनिष्ठ निवेदन हा उत्तम इतिहासलेखनाचा निकष मानला गेला. तसेच हा इतिहास व्यक्तीकेंद्रित व घटनाकेंद्रित होता. त्यात गतकालीन व्यक्तींच्या मानसिक व्यवहारांच्या अगर सामाजिक व्यवहारांच्या व त्यातील परिवर्तनांच्या विश्लेषणाला वाव नव्हता. ही उणीव भरून काढण्याचा प्रयत्न संरचनावाद करतो. अध्ययन विषयाच्या विश्लेषणाची शास्त्रीय व तर्कनिष्ठ पद्धती संरचनावादाने प्रचारात आणली. तिचा उगम भाषाशास्त्रीय अध्ययनातून झाला असला तरी तिचा वापर विभिन्न ज्ञानशाखांत 'मानसशास्त्र, समाजशास्त्र, मानववंशशास्त्र, तंत्रशास्त्र, भौतिकशास्त्र इत्यादीत केला गेला. त्यामुळे भिन्न ज्ञानशाखांत प्रसूत झालेल्या ह्या विश्लेषण पद्धतीला आंतरज्ञानशाखीय स्वरूप प्राप्त झाले.

संरचनावादाचा उगम संरचनावाद ह्या संज्ञेचा उगम १९१६ साली फर्डिनांद द सोस्यूर (*Ferdinand de Saussure)* ह्या स्वित्झरलंडमधील भाषाशास्त्रज्ञाने प्रकाशित केलेल्या '*Cours de Linguistique Generate*' ह्या ग्रंथात आढळतो. ह्या ग्रंथात त्याने भाषेच्या रचनेबाबत काही मूलभूत सिद्धांत मांडले. त्याने प्रतिपादित केलेल्या भाषा रचनेच्या विश्लेषणपद्धतीमुळे जेकस लकान, रोमन जेकबसन, मिशेल फुकाते, जे. एम्. केनीस, लुई अल्थूजर, रोनाल्ड बार्थ असे अनेक विचारवंत प्रभावित झाले. समाजशास्त्राच्या क्षेत्रात एमिल डरखाईम हा संरचनावादाचा अग्रदूत मानला जातो. इतिहासाच्या क्षेत्रात संरचनावादाचा आविष्कार ॲनल्स गटातील मार्क ब्लॉंच, लूसियन फाने व फर्नाद ब्रोदेल ह्यांच्या व क्लॉद लेवी स्ट्रॉस ह्याच्या लिखाणात निदर्शनास येतो. पुढे संरचनावादी विचारातून जेकस देरिदाचा (*Jacques Derrida)* विरचनावाद (*Deconstruction)* व उत्तर संरचनावाद (*post- structuralism)* उदयाला आले.

सरचनावादाच्या व्याख्या संरचनावादाची शब्दकोषातील स्थूलमानाने केलेली व्याख्या अशी की, "संपूर्ण सामाजिक व्यवहार व विचारातून आविष्कृत होणाऱ्या समाजाच्या आंतररचनांच्या आकृतिबंधांचा शोध घेणे व दर्शविणे म्हणजे संरचनावाद होय. भिन्न अभ्यासशाखांबाबतचा हा वैचारिक दृष्टिकोण ही व्याख्या दर्शविते. (*An approach to various areas of study, which seeks to identify underlying patterns or structures, especially as they might reflect patterns of behaviour or thought in society as a whole) (Chambers 21st century Dictionary)* समाजशास्त्रीय अध्ययनात संरचनावादाची व्याख्या "*The branch of science that studies society and the relationship of an individual within a society*" अशी केली जाते; तर मानववंशशास्त्राच्या अभ्यासात तिची व्याख्या "*An anthropological theory that there are unobservable social structures that generate observable social phenomena*" अशी केलेली आहे. एकूण

मानव्यशास्त्राच्या दृष्टीने विचार करता, समाजाच्या, अगर समाजगटांच्या दृश्य व्यवहारांच्या खाली दडलेल्या आंतररचनांचा, त्यातील घटकांच्या परस्परसंबंधाच्या आंतर व्यूहाचा बुद्धिनिष्ठ व शास्त्रीय पद्धतीने शोध घेण्याची अध्ययन पद्धती म्हणजे संरचनावाद; अशी स्थूलमानाने व्याख्या करता येईल. याचा अर्थ असा की संरचनावाद हे तत्त्वज्ञान नाही. मानवी जीवनासंबंधी हेगेल, मार्क्स इत्यादी तत्त्ववेत्त्यांनी मांडलेल्या तत्त्वज्ञानासारखे संरचनावादाचे स्वरूप नाही. ती केवळ एक अध्ययनपद्धती आहे. ह्या पद्धतीचा वापर वेगवेगळ्या विचारवंतांनी आपआपल्या अभ्यासक्षेत्रात वेगवेगळ्या प्रकारे केला. त्यामुळे त्यांना संरचनावादी अभ्यासक मानले जात असले तरी त्यांचा एकसंघी गट नाही. ते एका बौद्धिक चळवळीचे पाईक आहेत येवढेच ! सोस्यूरने हा सिद्धांत भाषाशास्त्राच्या क्षेत्रात मांडला; लुई अल्थूजर सारख्या मार्क्सवादी लेखकाने तो युद्धोत्तर जगातील आर्थिक व्यवहारांच्या विश्लेषणासाठी वापरला; रोमन जेकबसनने भाषेतील परिवर्तनाच्या अभ्यासातून तत्कालीन समाजघटकांच्या परस्परसंबंधांच्या स्पष्टीकरणासाठी तो वापरला; रोलॉ बार्थने साहित्याच्या समीक्षेच्या क्षेत्रात त्याचा वापर केला; लेवी स्ट्रॉसने भिन्न संस्कृतीतील मिथक कथांचा अभ्यास त्या पद्धतीने केला; तर समाजशास्त्रात त्याचा वापर प्रथम डरखाईमने व त्याच्या लिखाणाने प्रभावित झालेल्या 'ॲनल्स' इतिहासलेखकांनी केला. अशा ह्या अध्ययन पद्धतीचे मूळ फर्डिनांद द सोस्यूरच्या भाषाविश्लेषणात सामावले आहे. सोस्यूरचा संरचनावादी विचार सोस्यूर हा तौलनिक भाषाशास्त्राचा सखोल व चिकित्सक अभ्यासक म्हणून प्रख्यात आहे. आपल्या चिकित्सक अभ्यासाचे फलित त्याने १९९६ साली प्रकाशित झालेल्या ग्रंथात विशद केले. तो भाषेच्या आशयाचा नव्हे तर रचनेचा अभ्यास करतो. त्याचे एक प्रमेय असे की, भाषा ही समाजमान्य चिन्हांची (*signs)* व्यवस्था आहे. अशा चिन्हांचा वापर केवळ भाषेतच नव्हे तर अनेक क्षेत्रात केला जातो. भाषा ही एक स्वयंपूर्ण व्यवस्था आहे. भाषा ही वाक्यांनी व वाक्ये शब्दांनी तयार होतात. शब्दांचे कार्य चिन्हासारखे आहे. ह्या शब्दचिन्हाच्या दोन बाजू आहेत- ध्वनीप्रतिमा व संकल्पना. ध्वनीप्रतिमेला तो चिन्हक व संकल्पनेला वस्तूला चिन्हित म्हणतो. चिन्हक व चिन्हिताचा संबंध अतूट परंतु अनाकलनीय आहे. चिन्हकाचा चिन्हिताशी प्रत्यक्ष संबंध नसतो. रस्त्यावरील सिग्नलसमधील तांबड्या रंगाशी 'थांबा' ह्या अर्थाचा अर्थाअर्थी संबंध नाही किंवा गाढव ह्या शब्दाचा त्या विशिष्ट प्राण्याशी प्रत्यक्ष संबंध नाही. हा संबंध सामाजिक सर्वमान्य संकेतामुळे शब्दाला प्राप्त होतो. म्हणून हा चिन्हक व चिन्हितातील संबंध अभावात्मक आहे. गाढव हा दुसरा कोणता प्राणी नाही, घोडा नाही म्हणून तो गाढव आहे. म्हणजे भाषेचा मूळ घटक शब्द तो चिन्हक व चिन्हित मिळून बनतो. चिन्हक व चिन्हित यांना स्वतंत्र अर्थ नाही. त्याचा दुसरा सिद्धांत भाषेच्या एककालिक (*synchronic)* अभ्यासाचा आहे. भाषेच्या रचनेचा ऐतिहासिक उत्क्रांतीच्या संदर्भात अभ्यास करण्याची आवश्यकता तो मानीत नाही. तिसरा मुद्दा असा की सोस्यूर भाषेचे तीन स्तर मानतो. १) सर्वसामान्य भाषा म्हणजे *Language* २) विशिष्ट भाषिक व्यवस्था उदा. तमीळ, तेलगू, मराठी, हिंदी वगैरे. याला तो *Langue* म्हणतो. ३) भाषेचा व्यक्ती करते तो वापर. याला तो *parole* शब्द वापरतो. त्याचे मत असे की भाषेचा अभ्यास करताना त्याच्या रचनेचा म्हणजे, *Langue* चा अभ्यास महत्त्वाचा ठरतो, कारण ती रचना व्यक्तीच्या भाषेच्या वापराचा व एकूण सामाजिक भाषा व्यवहाराचा पाया असते. भाषेच्या रचनेच्या अध्ययनातून सामाजिक व सांस्कृतिक रचनेचा बोध होतो. तसेच भाषा ही सामाजिक विकासातून आकाराला येते, असेही सोस्यूर म्हणतो. सोस्यूरच्या भाषेच्या एककालिक अध्ययनाचा, तसेच भाषेच्या रचनेतील घटकांचा, त्यांच्या परस्परसंबद्धत्वाचा विचार संरचनावादी विश्लेषण पद्धतीचा आधार मानला जातो.

**संरचनावादी मूलभूत तत्त्वे :-**

१) संरचनावादी विचारपद्धतीच्या स्वरूपाचे आकलन स्पष्टपणे होण्यासाठी संरचनावादी दृष्टिकोणाची मूलभूत भूमिका ध्यानात घेणे आवश्यक ठरते. संरचनावाद ज्या अध्ययनविषयाचा अगर मानवी घडामोडींचा अभ्यास करतो, तो विषय अनेक लहान लहान घटकांनी मिळून चपलेला आहे; ह्या प्रत्येक घटकाला स्वतंत्र असे महत्त्व अगर अर्थ नाही; मात्र प्रत्येक पटक दुसऱ्या घटकाशी जेव्हा स्थिर संबंध प्रस्थापित करतो तेव्हा त्याला अर्थ प्राप्त होतो. अशा रीतीने अनेक घटकांचे परस्परसंबंधाचे मोठे जाळे, मोठी चौकट तयार होते, एक रचना तयार होते, असे संरचनावाद मानतो.

२) अशा रचनेचे दोन स्तर असतात पहिली वरवर दिसणारी दृश्य स्वरूपातील पृष्ठभागावरील रचना, तर दुसरी म्हणजे पृष्ठभागावरील रचनेच्या अंतर्गत असणारी, घटकांच्या परस्परसंबंधांची आंतररचना! संरचनावादाला पृष्ठभागावरील दृश्य रचनेचा अभ्यास अभिप्रेत नाही. ही रचना त्यांना महत्त्वाची किंवा अर्थपूर्ण वाटत नाही. त्याच्या लेखी आंतररचना महत्त्वाची असते. ह्या आंतररचनेमुळे वरच्या रचनेला अर्थ प्राप्त होतो, आणि आंतररचनेचा परिणाम वरील रचनेवर होत असतो. आंतररचनेत वास्तवाचा दृश्य आविष्कार नसला तरी त्यातून वास्तवाची बौद्धिक व मानसिक जाणीव व्यक्त होते व व्यापक स्तरावरील मानवाच्या हालचालींचे तसेच संस्कृतीचे आकलन होते.

३) संरचनावाद सर्व विश्वाकडे एक प्रचंड यंत्र म्हणून पाहातो. अगणित लहान- लहान घटक मिळून हे यंत्र तयार होते. मात्र ह्यातील एकेक घटक अर्थहीन असतो; कार्यप्रवण नसतो, तो जेव्हा दुसऱ्या घटकाशी जोडला जातो, तेव्हा तो क्रियाशील बनतो. अशा अनेक संबद्ध घटकांची रचना अभ्यासली की यंत्राचे स्वरूप कळते. याच प्रकारे मानवी समाजात अगर साहित्यात अनेक लहान घटक असतात; इतिहासात अनेक घटना असतात. त्यांना एकाकी अवस्थेत अर्थ नरातो, तर त्यांच्या परस्पर संबद्धतेमुळे एक रचना तयार होते. अशा प्रकारे अनेक संलग्न घटक एका मोठ्या रचनेचा भाग बनतात. ह्या आंतररचनेवर व त्यात आढळून येणाऱ्या बदलांवर संरचनावाद लक्ष केंद्रित करतो.

४) मानवी समाज हा अनेक घटकांच्या संबंधाचे जाळे आहे. त्यातील अंतःसूत्राचा, त्यात अनुस्यूत असलेल्या सर्वसाधारण रूढी व संकेतांचा शोध घेणे अभ्यासकाचे काम आहे. घडामोडी अगर घटना महत्त्वाच्या नसून, त्यात दडलेली, घटनाद्वारा व्यक्त होणारी व्यवस्था ही महत्त्वाची आहे असे संरचनावादी मानतात. सोस्यूरचा *Langue* व *parole* चा सिद्धांत वापरायचा तर घटना ह्या *parole* आहेत; अनेक घटनांच्या परस्परसंबद्ध स्वरूपाचा अभ्यास करून त्यामागील मानवी संबंधाच्या मूलगामी व्यवस्थेचे रूप कळते, संस्कृतीचे स्वरूप कळते व त्यातून मूळ मानवी स्वभावाचा वेध घेता येतो. संरचनावादाला अशा विश्वव्यापी, सार्वकालिक व्यवस्थेचा अगर मूलभूत रचनेचा शोध अभिप्रेत आहे.

५) संरचनावादाचा दुसरा घटक असा की परस्परसंबंधांची रचना अगर व्यवस्था ही परस्परविरोधी संकल्पनांच्या जोडीवर आधारलेली असते. याला ते *binary opposites* म्हणतात. प्रकाश/काळोख, जीवन/मृत्यू, निसर्ग/संस्कृती अशा परस्परविरोधी संकल्पना ह्या घटकांच्या परस्परसंबंधांचे कायमचे स्वरूप दर्शवितात.

६) संरचनावादाला ऐतिहासिकतेचे वावडे आहे. कोणत्याही गोष्टीचा अगर घटनेचा अभ्यास करताना ऐतिहासिक संदर्भाचा विचार ते करीत नाहीत, तर ते घटनेच्या एककालिकतेवर (*synchronic*) भर देतात. घटनेचा आशय काय आहे, त्याची कारणे व परिणाम काय आहेत याचा विचार न करता, त्या घटनेतील लहान घटकांच्या आंतरसंबंधांचा ते विचार करावा लागतो.

७) कोणत्याही विषयातील अंतःसूत्र अगर आंतरव्यवस्था समजून घेण्याचा संरचनावादाचा उद्देश हा हेगेल व मार्क्स ह्या तत्त्वज्ञांच्या अध्ययनपद्धतीशी काही अंशी जुळणारा आहे. हेगेलने वैश्विक व्यवहारामागील सूत्र शोधून काढून प्रगतीचा सिद्धांत मांडला. मार्क्सने मानवी विकासाच्या अध्ययनातून उत्पादन प्रक्रिया ही मानवी विकासाला कारणीभूत असल्याचा सिद्धांत मांडला. त्यांचे अध्ययनही घटनाकेंद्रित किंवा व्यक्तीकेंद्रित नाही. परंतु त्यांच्या व संरचनावादी दृष्टिकोणात भेद असा की अंतःसूत्राचा शोध घेण्यासाठी हेगेल व मार्क्स हे दृश्य घटनांचा अभ्यास करतात, संरचनावादी घटना व व्यक्तीकेंद्रित अभ्यास त्याज मानतात; ते केवळ आंतररचनेचाच विचार करतात. रोलाँ बार्त ह्याने '*Discourse of History*' ह्या आपल्या लेखात घटनात्मक इतिहास अर्थपूर्ण नसतो अशी टीका केली आहे. तो म्हणतो घटनाधारित इतिहास वास्तवाचे दर्शन घडवितो असा दावा केला जातो. परंतु वस्तुतः इतिहास हे गतकालीन वास्तवाचे दर्शन नसते, तर लेखकाला जे वास्तव वाटले, त्या वास्तवाची इतिहास ही प्रतिमा असते. वास्तव व त्याचे कथन ह्या दोन गोष्टी बार्त भिन्न मानतो. तो इतिहासकाराची व्याख्या वास्तव घटितांचे संकलन व आयोजन करणारा अशी न करता वास्तवाच्या प्रतिमा संकलित करून त्याचे दर्शन घडविणारा अशी करतो. लेवी स्ट्रॉस इतिहासाचे

संरचनावादी अध्ययन हे ऐतिहासिकतेपासून विलग असल्याचे (*detachted from historicity)* मत मांडतो.

संरचना व संरचनावाद या संज्ञाचे स्पष्टीकरण पुढील वाक्यात *J. Pouillon* याने '*Structure and Structuralism*' ह्या लेखात मार्मिकपणे दिले आहे. तो म्हणतो, *"Everyone knows that kinship, social institutions or a set of religious beliefs have a character of a system. But instead of describing these systems in order to establish a taxonomy' based on their external similarities, the structuralist asks what make a system a system, what rule governs its internal relations, what defines its possible transformations and may enable it to be brought together with other systems. In other words, a structuralist looks for the structuring factor behind a structured set and even behind that which fails to reach a precise and stable structure, but develops in a nebuous fashion as a myth"*

एकूण संचनावादाची वैशिष्ट्चे साररूपाने सांगावयाची झाल्यास ती पुढीलप्रमाणे सांगता येतात.

१) संरचनावादी दृष्टिकोण ही पॉझिटिविझमच्या भूमिकेविरुद्धची प्रतिक्रिया आहे.

२) घटना अगर व्यक्ती यांना केंद्रबिंदू मानून केलेल्या मानवकेंद्री लिखाणाविरुद्धची ही प्रतिक्रिया आहे.

३) कोणत्याही गोष्टीच्या/विषयाच्या उदाहरणार्थ, साहित्य, समाज, संस्कृती इत्यादी- रचनेच्या पृष्ठभागावरील आशय महत्त्वाचा नसून त्या खालील आंतररचनेचा, व्यवस्थेचा *a theory and technique of describing and classifying living and extinct organisms on the basis of their anatomical and morphological features and structures.* विचार महत्त्वाचा असतो अशी संरचनावादी भूमिका मानते.

४) संरचनावादाचा भर एककालिकलेवर आहे. कोणत्याही गोष्टीचा अगर विषयाचा ऐतिहासिक संदर्भात अभ्यास त्याला अभिप्रेत नाही.

५) अभ्यासविषयाचे लहानात लहान घटकांत विभाजन करून एका विभाजित घटकाचा दुसऱ्या घटकाशी संबंध आणि अशा अनेक घटकांच्या परस्पर संबंधाच्या विश्लेषणातून सर्वसाधारण व्यवस्थेचे ज्ञान होते; ही व्यवस्था सार्वकालिक असते आणि ती परस्परविरोधी संकल्पनांच्या जोडीवर आधारलेली असते, अशी संरचनावादाची भूमिका आहे.

६) संरचनावादाच्या मते समाजातील एक व्यक्ती किंवा इतिहासातील एखादी घटना यांना अर्थ नसतो, त्यांना अर्थ प्राप्त होतो तो एकाचा दुसऱ्याशी संबंध जुळल्यामुळे आणि म्हणून अशा संबंधाची मूलभूत रचना किंवा व्यवस्था अभ्यासली की त्या विषयाचे खरे बास्तव आकलन होते. एखाद्या गोष्टीचा किंवा घटनेचा अभ्यास तो एक संबंधांचे जाळे आहे अशा दृष्टीने करतो व त्यातील समान सूत्रांचा शोध घेतो. निर्णायक तत्त्वे शोधण्यासाठी एखादी घटना महत्त्वाची नसून तीतून व्यक्त होणारी व्यवस्था संरचनावाद महत्त्वाची मानतो. म्हणून ऐतिहासिक घटनांचे केवळ निवेदन म्हणजे इतिहास नाही; असे संरचनावाद म्हणतो. संरचनावाद व विरचनावाद :- संरचनावादातील काही मुद्यांना जेकस देरिदा *(Jacques Derrida)* याने आव्हान उभे केले. १९६६ साली '*Structure Sign and Play in the Discourse of the Human Sciences*' हा शोध निबंध वाचून त्याने नवा सिद्धांत मांडला. पुढील वर्षी त्याचा सर्वात महत्त्वाचा *Grammatology* हा विचारप्रवर्तक ग्रंथ प्रकाशित झाला. त्याचा विचार 'विरचनावाद' म्हणून प्रसिद्ध आहे. विरचना म्हणजे मूळ रचनेचे विघटन करून त्यातून पर्यायी नवी रचना उभी करणे! सोस्यूरच्या मते चिन्हक-चिन्हित यांचा संबंध प्रत्यक्षात नसतो. देरिदाच्या मते शब्द-चिन्हक हे अर्थहीन नसतात, तर परंपरेने चालत आलेले सांस्कृतिक घटक त्यात रुजलेले असतात. माणसाच्या जाणिवेची रचना परस्परविरोधों संकल्पनांच्या जोड्यांवर आधारित असते. त्यातील पहिल्या घटकाला म्हणजे पुरुष/स्त्री, मी/इतर यातील पुरुष व मी यांना परंपरेने सकारात्मक अर्थ दिलेला आहे. परंतु या संज्ञांना एकाकीपणे अर्थ नाही. या जोड्यांतील विभाजन रेषा पुसून टाकली तर दोहोतील विरोध पुरुष-स्त्री, मी इतर यातील विरोध गळून पडतो, ते एका समांतर रेषेत येतात. यामुळे जाणिवेचे रूप बदलते, मूल्ये

बदलतात व संस्कृतीची विरचना होते. म्हणून देरिदाच्या मते कोणतीही रचना अगर मूल्यव्यवस्था ही वैश्विक व सार्वकालिक नाही.

संरचनावाद व उत्तर संरचनावाद विरचनावादाप्रमाणे एकोणिसाव्या शतकाच्या अखेरच्या चतुर्थात उत्तर संरचनावाद ही संज्ञा प्रचलित झाली. ही संज्ञा संरचनावादानंतर प्रचारात आली, परंतु मिशेल फुको सारखे काही लेखक संरचनावादी व उत्तर संरचनावादी गटात मोडतात, कारण दोहोत काही साम्य व काहीसा भेद आहे. उत्तर संरचनावाद ही एकसूत्री तत्त्वप्रणाली नसून काही सिद्धांतांचा संच आहे. संरचनावाद व उत्तर संरचनावादातील मुख्य सादृश्य म्हणजे दोन्ही संकल्पना पॉझिटिविझमची भूमिका अमान्य करतात. मानवकेंद्री अभ्यास-घटना व व्यक्तीवर केंद्रित इतिहास त्यांना खरा इतिहास वाटत नाही. ज्ञानाचे वैश्विक स्वरूप ते मानीत नाहीत. दोहोतील प्रमुख भेद असे की संरचनावाद कोणत्याही विषयातील आंतर व्यवस्थेचा शोध घेतो. म्हणजे तर्कनिष्ठरीत्या अनेकातील ऐक्याचा शोध घेतो, उत्तर संरचनावाद असे ऐक्य शोधण्याचा प्रयत्न निरर्थक मानतो, कारण कोणतीही रचना व तिचा अर्थ संदिग्ध असतो, तात्कालिक व गुंतागुंतीचा असतो. माणसाच्या जाणिवा वैश्विक नसतात. माणूस हा समाजाची निर्मिती आहे. कुटुंब, भौतिक स्थिती, रूढी संकेत, लिंगभेद यातून तो घडत असतो, म्हणून त्याच्या जाणिवांची स्थिररचना नसते. वास्तव हे विस्कळित, बहुविध आहे, विभाजित आहे, खंडित आहे; म्हणून ते आंतरव्यवस्थेचा शोध घेण्याऐवजी घटकांचा अभ्यास महत्त्वाचा मानतात. कोणतीही भाषिक रचना, लेखन, इतिहास हे लेखकाचे परिभाषित (*discourse)* आहे. त्यात वरवरच्या आशयाशिवाय अतिरिक्त अर्थ अध्याहृत असतात असे उत्तर संरचनावाद म्हणतो. वास्तवाबाबतच्या त्यांच्या दृष्टिकोणामुळे भुत्तर संरचनावाद व उत्तर आधुनिकवाद हे जवळचे वाटतात.

इतिहासातील संरचनावादी लेखन इतिहासाच्या क्षेत्रात संरचनावादाचा आविष्कार दोन प्रकारे झालेला आढळतो. पहिला प्रकार म्हणजे ॲनल्स गटातील इतिहासकारांचे, प्रामुख्याने मार्क ब्लॉच व फर्नाद ब्रोदेल यांचे आणि दुसरा मानववंशशास्त्रज्ञ लेवी स्ट्रॉस याचे इतिहासलेखन हे होत.

'ॲनल्स' या संज्ञेने परिचित असलेल्या मार्क ब्लॉच, लुसियन फाब्रे व फर्नांद ब्रोदेल यांनी गतकालीन घटनांचा व परिवर्तनाचा अभ्यास भौगोलिक, समाजशास्त्रीय, अर्थशास्त्रीय व मानसशास्त्रीय संकल्पनांच्या आधारे केला. गतकाळातील एका घटनेचा अगर प्रसंगाचा ते अभ्यास करीत नाहीत, तर दीर्घकालावधीत घडणाऱ्या घटनांचा अभ्यास करून, त्यांचे विश्लेषण करून त्यांचा व्यापक दृष्टीने, विविध शक्तिप्रवाहांच्या संदर्भात अन्वयार्थ लावतात. मानवी समाजाच्या घडणीला कारणीभूत होणाऱ्या नानाविध आंतरप्रवाहांच्या प्रभावाचा ते शोध घेतात. घटना व व्यक्तीचे कार्य हा ते मानवी जीवनाचा दृश्य स्तर मानतात. त्या स्तराखालील कार्यरत असलेले घटक वरील स्तराचे रूप व आकार निर्धारित करतात असे ते मानतात. हे आंतरप्रवाह म्हणजे सामाजिक परंपरा, रूढी, आर्थिक व्यवहार, मनः प्रवृत्ती तसेच भौगोलिक घटक होत. समाजजीवनाचे दृश्य रूप ह्या आंतरप्रवाहांनी निर्धारित होते व बदलते. ब्रोदेल ॲनल्सचा इतिहासविचार मांडताना पॉझिटिविझम नाकारतो आणि सामाजिक अध्ययनात एक व्यक्ती अगर एक घटना अर्थपूर्ण नाही; स्वयंचलित नाही असे म्हणतो. माणसाच्या शक्तिपलीकडील अनेक गोष्टी अभावितपणे त्याच्या जीवनाचा मार्ग ठरवीत असतात. ह्या अदृश्य असतात. ह्या अदृश्य अमानवीय शक्तीप्रवाहांची रचना अभ्यासणे, त्यांचे विश्लेषण करणे व मानवी जीवनातील त्यांची भूमिका स्पष्ट करणे हे संरचनात्मक इतिहासाचे व्यवच्छेदक लक्षण आहे, असे ब्रोदेल म्हणतो. या अनुरोधाने भूमध्यसागरालगतच्या प्रदेशासंबंधीच्या प्रचंड इतिहासग्रथांत, तो प्रथम दृश्य स्तराचे, नंतर चाळीस पन्नास वर्षांच्या काळातील सामाजिक, आर्थिक, राजकीय घटकांचे विवेचन करतो. परंतु तो सर्वात महत्त्वाचा मानतो तो तिसरा भौगोलिक स्थितीचा स्तर. याला तो *structures* म्हणजे मूळ रचना असे म्हणतो. ह्या रचनेबाबत माणसाची समाजाची प्रतिक्रिया धिम्या गतीने होते. मात्र ह्या रचनेचे परिणाम निर्णायक व दीर्घकालीन असतात. माणसाच्या कृती व निर्णय ह्या आंतररचना निर्धारित करतात. म्हणून मानवी समाजाचा व त्याला प्रभावित करणाऱ्या सर्व आंतरप्रवाहांच्या रचनांचा अभ्यास ब्रोदेल व लादुरी सारखे लेखक महत्वाचा मानतात. या दृष्टीने 'ॲनल्स' गटाची भूमिका संरचनावादी असल्याचे म्हटले जाते.

**क्लॉद लेवी-स्ट्रॉस (*Claude Levi-Strauss) :-***

संरचनावादी इतिहासलेखनाच्या क्षेत्रातील अग्रगण्य लेखक म्हणून लेवी स्ट्रॉस याची प्रसिद्धी आहे. १९०८ साली जन्माला आलेल्या ह्या फ्रेंच तत्त्ववेत्त्याच्या अभ्यासाचे प्रमुख क्षेत्र मानववंशशास्त्र असले तरी भूगर्भशास्त्र, तत्त्वज्ञान, मानसशास्त्र, मार्क्सवाद, भाषाशास्त्र व संस्कृतींचाही त्याचा सखोल अभ्यास आहे. संरचनावादी पद्धतीने त्याने विभिन्न समाज गटांच्या संस्कृतीचा अभ्यास केल्यामुळे त्यांचा उल्लेख संरचनावादी इतिहासकार असा करण्यात येतो.

द्वितीय महायुद्धापूर्वी काही वर्षे लेवी स्ट्रॉसने दक्षिण अमेरिकेतील ब्राझीलमध्ये व अमेरिकेत अध्यापनाचे काम केले. नंतर तो फ्रान्सला स्थायिक झाला. ब्राझील व अमेरिकेतील वास्तव्यात तेथील मूळ रहिवासी असलेल्या इंडियन जमातींच्या समाजव्यवस्थेचा, व्यवहारांचा, भाषेचा संस्कृतींचा व लोककथांचा त्याने अभ्यास केला. ह्या अध्ययनात, जगाच्या पाठीवरील इतरही काही आदीम समाजांच्या संस्कृतीचा त्याने समावेश केला. जीवनाची सुमारे पंचवीस वर्षे त्याने ह्या अध्ययनात व्यतीत केली. त्याच्या ह्या अध्ययनाचे वैशिष्ट्य म्हणजे भिन्न संस्कृतींच्या अध्ययनासाठी त्याने संरचनावादी विश्लेषण पद्धतीचा वापर केला. मानववंशशास्त्र आणि संरचनावादाच्या त्याने केलेल्या वैशिष्ट्यपूर्ण समन्वयाचा प्रभाव १९६० नंतरच्या अनेक मानव्यशास्त्रज्ञांच्या लिखाणावर पडलेला निदर्शनास येतो. त्याच्या दीर्घ व्यासंगाचे फलित म्हणजे *The Elementary Structures of Kinship. The Raw and the Cooked, The Savage Mind, Myth and Meaning* आणि सर्वात महत्त्वाचा *'Mythologiques'* हा चार खण्डात प्रकाशित झालेला ग्रंथ हे होत.

ह्या लिखाणातून लेवीची संरचनावादी विश्लेषणपद्धती, इतिहास व संस्कृती बाबतची मते व्यक्त होतात. कोणत्याही रचनेच्या अगर समाजाच्या पृष्ठभागावर आढळणाऱ्या भिन्नतेमागील, त्यात दडलेल्या अकल्पनीय एकसूत्राचा शोध घेण्याचे तंत्र; *(search for unsuspected harmonies)* अशी संरचनावादाची व्याख्या लेवी करतो. संरचनावादी प्रक्रियेची चार मूलभूत प्रमेये तो सांगतो. १) संस्कृतीच्या आंतररचनेचे २) सांस्कृतिक रचनेतील प्रत्येक लहान घटक स्वायत्त नसून ते परस्परसंबंधित आहेत असे मानणे ३) रचनेच्या आशयावर नव्हे तर आंतररचनेवर लक्ष केंद्रित करणे ४) आणि ह्या द्वारा आंतररचनेची कारणे शोधून सामान्य सिद्धांत प्रतिपादित करणे. पृष्ठभागावरील रचनेच्या खालच्या स्तरावरील घटकांचे आंतरसंबंध परस्परविरोधी संकल्पनांच्या जोड्यांवर (*binary opposites)* आधारित असतात हा संरचनावादी विचार तो मान्य करतो. ह्या संकल्पना वैश्विक स्वरूपाच्या असतात. व त्यांच्या आकलनाखेरीज संस्कृतीचे आकलन होत नाही, कारण संस्कृती ही चिरकालीन संकल्पनांचा आविष्कार असते असे लेवी म्हणतो. लेवी हा मुळात मानववंशशास्त्रज्ञ असल्यामुळे मानवी समाज व त्याचे दर्शन घडविणारा इतिहास याचाही विचार त्याने केला आहे. केवळ घटनांचे वर्णन करणारा इतिहास, तो चांगला इतिहास मानीत नाही. इतिहासाला तो "*ahistorical matrix*" म्हणतो. मॅट्रिक्स म्हणजे परस्परसंबंध स्पष्ट करण्यासाठी आकड्यांची, प्रतिकांची एका सरळ रेषेत अगर स्तंभात केलेली मांडणी, गतकाळाचा इतिहास लिहिताना त्यातील घटना किंवा प्रसंग (याला तो *parole* म्हणतो) वेगळे करून त्यातील परस्पर संबंधाची रचना अभ्यासणे (ह्या रचनेला तो सोस्यूरच्या भाषेत *Langue* म्हणतो) हे तो इतिहासाचे उद्दिष्ट मानतो. घटना एककालिक तर त्यांच्या आंतरव्यवस्थेचे स्वरूप वैश्विक असते असे मत तो व्यक्त करतो.

लेवीला जागतिक क्षेत्रात प्रसिद्धी मिळवून देण्यास त्याचे मिथक कथांचे विश्लेषण व त्यातून त्याने मांडलेले सामान्य सिद्धांत विशेष कारणीभूत आहेत. अमेरिकन इंडियन आदीम जमातींच्यात प्रचलित असलेल्या अगणित मिथक कथा त्याने अभ्यासल्या. त्यातून आढळणाऱ्या त्यांच्या जीवनपद्धती, वेष, अन्न, भाषा, लैंगिक व्यवहार, धार्मिक श्रद्धा व सामाजिक संबंध यांचे त्याने संरचनावादी पद्धतीने विश्लेषण केले. त्यातून त्याने काढलेले सामान्य सिद्धांत असे की, ह्या भिन्न भागातील मिथक कथांतील प्रसंग व व्यक्ती वेगळ्या असल्या तरी त्यांच्या आंतरसंबंधांचा व वर्तणुकीचा विचार केल्यास त्यात सादृश्य आढळून येते. म्हणून एका कथेतील प्रसंग स्थानिक व एककालिक असले तरी त्यांची

आंतररचना कालातीत असते. *'The Savage Mind'* मध्ये तो म्हणतो, *"No anthropologist can fail to be struck by the common manner of conceptualizing initiation rites employed by the most diverse societies throughout the world; whether in Africa, America or Australia, the rites follow the same pattern"* मिथक कथांच्या आंतररचनेतील मूलभूत साम्याचे लेवीने केलेले स्पष्टीकरण मानवी मेंदूच्या समाज कार्यावर आधारले आहे. तो म्हणतो की, निसर्गतः माणसाच्या मेंदूची रचना व कार्यपद्धती समान असते. तिचे दृश्य आविष्कार त्यावर होणाऱ्या संस्कृतीच्या प्रभावामुळे बदलतात. म्हणून संस्कृतीचा वरचा आविष्कार नव्हे तर आंतरसंबंधांची रचना अभ्यासल्यास त्यात साम्य आढळून येते, असे विवेचन *'The Raw and the Cooked'* मध्ये तो करतो. मिथक कथा केंव्हा तरी कित्येक शतकापूर्वी जन्माला आलेल्या असतात, त्या वारंवार अनेक वर्षे सांगितल्या जातात, तेव्हा त्यात काळानुसार भर पडत जाते. मूळ कथेवर थर साचत जातात. परंतु त्यामुळे कवेच्या मूळ गाभ्यात बदल होत नाही. त्यामुळे त्यांची आंतररचना ही सार्वकालिकच असते. मात्र ह्याचा शोध घेण्यास तर्कनिष्ठ व शास्त्रीय संरचनावादी विश्लेषण आवश्यक असते. मिथक कथा व त्यातील प्रतीके विशिष्ट संस्कृतीचे निदर्शक नसतात. तर एकूण सर्वसाधारण मानवी संस्कृतीचे संकेत असतात आणि म्हणूनच प्राचीन काळातील आदीम समाजाची नैसर्गिक व्यवहारप्रक्रिया व औद्योगिक दृष्ट्या विकसित समाजगटांची मूळ मानसिक प्रक्रिया यात साम्य आढळते. हा लेवीने मांडलेला सिद्धांत म्हणजे मानवी व्यवहारांच्या तात्त्विक अध्ययनाला त्याने केलेले मोलाचे योगदान होय. संरचनावादाने इतिहासलेखनक्षेत्राला काय दिले? इतिहासलेखनाच्या क्षेत्रातील एक नवा प्रयोग म्हणून संरचनावादाने हे क्षेत्र समृद्ध केले. व्यक्ती व घटनाधिष्ठित लेखनाच्या रूढ पद्धतीला आव्हान उभे केले. गतकाळातील मानवी जीवनाचे वास्तव इतिहास दर्शवितो हा दावा संरचनावादाने अमान्य केला. मानवी समाजाच्या प्रभागावरील स्तरांचा अभ्यास करून समाजाच्या व्यवहारांचे सम्यक् आकलन होत नाही, त्यासाठी पृष्ठभागाखाली दडलेल्या व्यूहाचा, व्यवस्थेचा अभ्यास आवश्यक आहे असे मत मांडून इतिहासलेखनाला नवा आयाम दिला. के. रं. शिरवाडकर म्हणतात त्याप्रमाणे 'संरचनावादाला शोध असतो तो घटना व कृतीमागील विश्वव्यापी सार्वकालीन व्यवस्थेचा ! विशेष उदाहरणांकडून साधारण पद्धतीकडे जाणे आणि अशा अनेक पद्धतींना जोडून त्यामागील संस्कृतीचे स्वरूप शोधणे व शेवटी मानवी स्वभावाचा शोध घेणे' ही अभिनव अध्ययनपद्धती इतिहासाच्या क्षेत्रात आणण्याचे श्रेय संरचनावादाला आहे. दीर्घकालखंडातील सामाजिक व्यवहारांचा अभ्यास खोलात शिरून करायचा तर त्यासाठी आंतरज्ञानशाखीय दृष्टिकोणाचे महत्त्वही त्याने प्रतिपादित केले. सर्व संरचनावादी इतिहासलेखक समाजशास्त्र, मानसशास्त्र, भूगोलशास्त्र, अर्थशास्त्र, मानववंशशास्त्र, भाषाशास्त्र इत्यादी विभिन्न ज्ञानशाखांचे अभ्यासक असल्याचे निदर्शनास येते. यामुळे त्यांचे लिखाण सखोल, तसेच बहुआयामी बनले आहे. परंतु संरचनावादी विचार ही एक बौद्धिक चळवळ असल्यामुळे व त्याची विषयाची मांडणी बरीच क्लिष्ट व गुंतागुंतीची व भाषा देखील कधी कधी सामान्य वाचकाला दुर्बोध वाटणारी असल्यामुळे, ह्या अभ्यासपद्धतीचा व्यापक प्रभाव इतिहासलेखनावर पडलेला आढळत नाही. शिवाय यातूनच विरचनावाद, उत्तर संरचनावाद असे फाटे फुटल्यामुळे काही संरचनावादी लेखक विरचनावादी अगर उत्तर संरचनावादी झाल्याचे आढळते. यामुळे हा प्रवाह वृद्धिंगत होण्याऐवजी १९८० च्या सुमारास त्याला ओहोटी लागल्याचे निदर्शनास येते.